दैनिक
लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

नीट पेपर लीक प्रकरणात संजीव मुखियाला क्लिन चीट

नवी दिल्ली दि.२३ (वृत्तसंस्था)- देशभरात गाजत असलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणात महत्त्वाची माहिती समोर आली आहे. नीट २०२४ परीक्षा प्रश्नपत्रिका चोरी प्रकरणात सीबीआयने महत्त्वाची माहिती दिली. या प्रकरणाचा मुख्य सूत्रधार मानल्या जाणाऱ्या संजीव कुमार उर्फ संजीव मुखिया याच्याविरोधात प्रश्नपत्रिका चोरी किंवा ती वाटल्याचे कोणतेही पुरावे मिळालेले नाहीत, असे सीबीआयने स्पष्ट केले. त्यामुळे संजीव मुखियाला या प्रकरणात मोठा दिलासा मिळाला आहे. त्याला या प्रकरणातून जाणीवपूर्वक वाचवले जात आहे किंवा चार्जशीटमधून वगळले गेले, हे आरोप सीबीआयने पूर्णपणे फेटाळून लावले. २०२४ मध्ये बिहार पोलिसांनी नीट परीक्षा प्रश्नपत्रिका चोरी प्रकरणाचा पर्दाफाश करत एफआयआर नोंदवला होता. संजीव मुखियाचे नाव यापूर्वीही विविध स्पर्धा परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटी आणि चोरीच्या प्रकरणांमध्ये समोर आले होते. याच पार्श्वभूमीच्या आधारे बिहार पोलिसांनी सुरुवातीच्या तपासात त्याला आरोपी केले होते. बिहार पोलिसांकडून तपास हाती घेतल्यानंतर सीबीआयने या संपूर्ण कटाचा सखोल तपास केला. झारखंडमधील हजारीबाग येथील ओएसिस स्कूल परीक्षा केंद्रातून प्रश्नपत्रिकेपर्यंत आरोपी पोहोचले होते. प्रश्नपत्रिका चोरल्यानंतर उत्तरपत्रिका तयार करणाऱ्या गटाने ती सोडवून काही उमेदवारांपर्यंत पोहोचवली. संजीव मुखियाने प्रश्नपत्रिका चोरली, ती लीक केली, उत्तरपत्रिका उमेदवारांपर्यंत पोहोचवली किंवा या संपूर्ण कट रचला, असा कोणताही पुरावा तपासात मिळालेला नाही. सीबीआयने सुप्रीम कोर्टात आणि न्यायालयात दाखल केलेल्या दोषारोपपत्रातही त्याच्या नावाचा समावेश केलेला नाही. सीबीआयने या प्रकरणात प्रश्नपत्रिका चोरीपासून ते तिचा गैरफायदा घेणाऱ्या उमेदवारांपर्यंत सर्वांची ओळख पटवली आहे. आतापर्यंत पाटण्यातील ४५ आरोपींविरुद्ध चार्जशीट दाखल करण्यात आली असून कोणत्याही दोषीला सोडण्यात आलेले नाही.

(वर्ष ६५ वे अंक १८८) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शुक्रवार, दि.२४ जुलै २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)

सीजेपीकडून आज देशव्यापी आंदोलनाची घोषणा

विद्यार्थी संघटना, सामाजिक संघटनांना सहभागी होण्याचे आवाहन

नवी दिल्ली दि.२३ (वृतसंस्था)- नीट पेपरफुटी आणि देशातील शिक्षणाचा दर्जा सुधारला जावा यासाठी कॉकरोच जनता पार्टीकडून राजधानी नवी दिल्लीत जंतर मंतरवर आंदोलन करण्यात येत आहे. कॉकरोच जनता पार्टी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यावर ठाम आहे. सीजेपीच्या २० जुलैच्या मोर्चावर पोलिसांकडून लाठीमार करण्यात आला होता. त्या विरोधात कॉकरोच जनता पार्टीनं २४ जुलै रोजी देशव्यापी आंदोलनाची घोषणा केली आहे. हे आंदोलन शांततापूर्ण मार्गानं करण्यात यावं, असं आवाहन करण्यात आलं आहे.

सीजेपीनं उद्या देशभरात होणारं आंदोलन प्रत्येक जिल्ह्यात व्हावं, संपूर्ण देशभरात एकाच वेळी आंदोलन करण्यात यावं, असं आवाहन केलं आहे. देशभरातील विविध विद्यार्थी संघटना, सामाजिक संघटनांनी या सगळ्यात सहभागी व्हावं, असं आवाहन सीजेपीनं केलं आहे. या आंदोलनासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या घ्याव्यात, असंही सांगण्यात आलं आहे. सर्व जण एकत्र आल्यानंतर सर्व

संघटनांनी सीजेपीकडून करण्यात आलेल्या चार मागण्या सर्वांना वाचून दाखवाव्यात असं सांगण्यात आलं आहे.

आंदोलनस्थळी इन्कलाब जिंदाबाद आणि भारत माता की जय अशा घोषणा द्याव्यात, असं सीजेपीकडून सांगण्यात आलं आहे. सीजेपीनं चार प्रमुख मागण्या केल्या होत्या, त्यामध्ये धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला जावा, आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना सरकारनं एक कोटी रुपयांची नुकसान भरपाई दिली जावी. विद्यार्थी आंदोलकांवर गुन्हे दाखल करु नये. दिल्लीत विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करणाऱ्या पोलिसांवर कारवाई व्हावी, अशी मागणी सीजेपी केलेली आहे.

दरम्यान दिल्लीतील जंतर मंतरजवळ विद्यार्थी आणि पोलिसांमध्ये काल रात्री पुन्हा संघर्ष झाला. पोलिसांच्या माहितीनुसार, कनॉट प्लेसमधील टॉल्स्टॉय मार्गाजवळ काही आंदोलकांनी पोलिसांवर दगड आणि बाटल्यांनी हल्ला केला. या हल्ल्यात कनॉट प्लेसचे एसीपी विवेक भगत जखमी झाले.

प्रत्युत्तरात पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या सोडल्या. या घटनेचे व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आले असून, त्यात आंदोलक काठ्या घेऊन पोलीस अधिकाऱ्यांवर हल्ला करताना दिसत आहेत. हा संघर्ष सुमारे १५ मिनिटे चालला, पण त्यानंतर परिस्थिती सामान्य झाली आहे.

यापूर्वी, पंजाबी बागचे एसीपी जय प्रकाश हे देखील आंदोलकांच्या हल्ल्यात जखमी झाले. त्यांच्या म्हणण्यानुसार, एक दगड थेट त्यांच्या कपाळावर लागला. गुरुवारी सकाळी, दिल्लीतील १६ मेट्रो स्थानके पुढील सूचना मिळेपर्यंत बंद ठेवण्यात आली होती. कॉकरोच जनता पार्टी २० जूनपासून जंतर मंतरवर आंदोलन करत आहे. २० जुलै रोजी, सीजेपीच्या संसद मोर्चादरम्यान संघर्ष झाला होता, ज्यात आंदोलक संसदेच्या प्रवेशद्वाराजवळ पोहोचले होते. त्यांना पांगवण्यासाठी लाठीचार्ज करण्यात आला.

दिल्लीतील जंतर मंतरवर कॉकरोच जनता पक्षाचे आंदोलन सुरूच आहे. आजही हजारोंचा जमाव आहे. अभिजित दीपके यांनी आरोप केला आहे की, भाजप पुरस्कृत गुंड आंदोलकांमध्ये घुसून दगडफेक करत आहेत. अभिजित दिपके म्हणाले की, जंतर मंतरवर महिनाभरापासून आंदोलन सुरू आहे, पण अशी कोणतीही घटना घडली नाही. आता दगडफेकीद्वारे आंदोलनाला बदनाम करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

पोलीस स्वतःच तिथे दगडांनी भरलेले ट्रक आणत आहेत. दरम्यान, पक्षाचे प्रवक्ते आशुतोष रांका म्हणाले की, जोपर्यंत धर्मेंद्र प्रधान राजीनामा देत नाहीत, तोपर्यंत झुरळ जनता पक्षाचे आंदोलन सुरूच राहील. रांका म्हणाले की, ते सरकारशी बोलण्यास तयार होते, पण सरकारने वेळकाढूपणा केला. आता जर त्यांना बोलायचे असेल, तर त्यांना जंतर मंतरवर यावे लागेल.

दिल्लीतील आंदोलनाचे महाराष्ट्रात पडसाद

वंचितकडून महाराष्ट्र बंद, कार्यकर्ते रस्त्यावर उतरले

मुंबई दि.२३ (प्रतिनिधी)- दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचे महाराष्ट्रात पडसाद उमटले आहेत. दिल्लीत आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या अमानुष लाठीचार्जच्या निषेधार्थ आज (दि. २३ जुलै) वंचित बहुजन आघाडीने महाराष्ट्र बंद पुकारला. त्याला काही ठिकाणी उत्स्फुर्त तर काही ठिकाणी संमिश्र प्रतिसाद मिळाला. मुंबई, ठाणे, वसई- विरार, कोल्हापूर, बुलढाणा, नाशिकमध्ये वंचितचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरल्याचे दिसून आले.

पुण्यात भिडे वाड्यापासून सुरु झालेला वंचितचा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. यावेळी आंदोलकांनी व्यापाऱ्यांना दुकाने बंद ठेवण्याचे आवाहन केले. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणी करत जोरदार घोषणा देण्यात आल्या. अकोला, छत्रपती संभाजीनगर, हातकणंगले (कोल्हापूर), बीड वडवणी, दिंडोरी (दि. नाशिक), नागपूर येथेही दुकानदारांनी दुकाने बंद करुन विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवल्याचे वंचित बहुजन आघाडीने म्हटले आहे.

महाराष्ट्र बंददरम्यान मुंबईत पोलिसांनी वंचित बहुजन आघाडीच्या सुमारे ३ हजार कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. काही कार्यकर्त्यांना नोटीस दिल्या आहेत. त्यांना धमकावले जात आहे, असा आरोप प्रकाश आंबेडकर यांनी केला. पेपरफुटी प्रकरणी कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

ठाण्यातल्या इंदिरानगर भागात वंचितचे कार्यकर्ते आक्रमक झाले होते. तिथे वंचितच्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेण्यात आलं. वंचित बहुजन आघाडीच्या आंदोलनाला पोलिसांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये कोणतीही परवानगी दिलेली नसतांना शहराच्या मध्यवर्ती भाग असलेल्या पैठण गेट, गुलमंडी भागात वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी रस्त्यावर उतरुन व्यापाऱ्यांना आपली दुकाने बंद करण्याचे आवाहन केले होते. यावेळी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील मसा खंडेश्वरी येथे दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला समर्थन आणि वंचित बहुजन आघाडीने पुकारलेल्या महाराष्ट्र बंदला पाठिंबा देत कार्यकर्त्यांनी येरमाळाकळंब रोडवर चक्काजाम आंदोलन केले. या आंदोलनामुळे येरमाळाकळंब मार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. आंदोलनस्थळी कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत विद्यार्थ्यांच्या मागण्यांना पाठिंबा दर्शविला.

वंचितच्या या बंदला अकोला जिल्ह्यात मोठा प्रतिसाद मिळाला. शहर कोतवाली भागात पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतल्याने गोंधळ उडाला होता. पोलीस व आंदोलकांमध्ये बाचाबाची झाली. (पान ४ वर)

राहुल गांधींसह अनेक खासदार पुन्हा रस्त्यावर

नवी दिल्ली दि.२३ (वृत्तसंस्था)- राहुल गांधी यांच्यासह सर्व विरोधी खासदार आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ पुन्हा एकदा रस्त्यावर उतरले आहेत. गुरुवारी संध्याकाळी राहुल यांच्या निवासस्थानी एक सभा झाली. त्यानंतर, सर्वजण ३० जानेवारी मार्गासाठी बसने निघाले. मात्र, पोलिसांनी बसेस आणि बॅरिकेड्स लावून त्यांचा मार्ग आधीच अडवला होता. रात्री १० वाजण्याच्या सुमारास हा मार्ग पुन्हा खुला करण्यात आला.

प्रियांका गांधी बसच्या चालकाच्या आसनाजवळ गेल्या आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांशी बोलताना दिसल्या. त्यांनी बसला पुढे जाण्यासाठी मार्गाकडे इशाराही केला. दरम्यान, राहुल गांधी बसमध्येच उभे राहिले. ते म्हणाले, 'बस इथेच उभी आहे. आम्ही पुढे जाऊ शकत नाही, पण विद्यार्थ्यांना मुख्य संदेश हा आहे की, आम्ही तुमच्यासोबत आहोत...'

यापूर्वी, २१ जुलै रोजी, मल्लिकार्जुन खरगे यांच्या वाढदिवसानिमित्त, काँग्रेसने एक गुप्त बैठक घेतली होती, ज्यात पंतप्रधानांच्या निवासस्थानाला घेराव घालण्याची योजना आखण्यात आली होती. संभाव्य गोंधळाची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी आधीच सुरक्षा वाढवली होती.

नीट पेपरफुटीविरोधात ठाकरे बंधूंचा एल्गार

२६ जुलैला विद्यार्थ्यांसोबत मुंबईत भव्य मोर्चा, पालकांनाही सहभागी होण्याचे आवाहन

मुंबई दि.२३ (प्रतिनिधी)- नीट पेपरफुटी प्रकरण आणि देशभरात सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर झालेल्या पोलिसी कारवाईचा निषेध करत दोन्ही नेत्यांनी २६ जुलै रोजी मुंबईत संयुक्त मोर्चा काढण्याची घोषणा केली.

राज ठाकरे म्हणाले की, देशभरात सुरू असलेले विद्यार्थी आंदोलन पूर्णपणे शांततापूर्ण होते. मात्र, त्याला दडपण्यासाठी विद्यार्थी आणि विद्यार्थिनींवर दबाव टाकला जात असून त्यांच्यावर लाठीमार करण्यात येत आहे. या कारवाईचे पडसाद आता संपूर्ण देशात आणि महाराष्ट्रातही उमटत असल्याचे त्यांनी सांगितले.

राज ठाकरे यांनी भाजपला त्यांच्याच पूर्वीच्या भूमिकेची आठवण करून दिली. विरोधी पक्षात असताना भाजपने अनेक मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती, असे सांगत त्यांनी २६/११ हल्ल्यानंतर तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांच्या राजीनाम्याचा तसेच मुंबईचे तत्कालीन पोलीस आयुक्त अरूप पटनायक यांच्याविरोधातील आंदोलनाचा उल्लेख केला.

"एखाद्या खात्यात अपयश आले तर त्याची जबाबदारी संबंधित मंत्र्यांनी स्वीकारली पाहिजे. विद्यार्थ्यांची सुरुवातीची मागणी केवळ केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची होती. मात्र, विद्यार्थ्यांवर झालेल्या कारवाईनंतर हा प्रश्न आता पंतप्रधानांपर्यंत पोहोचला आहे," असे राज ठाकरे म्हणाले.

सरकारने आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांना चर्चेसाठी बोलावले असते, त्यांच्या समस्या समजून घेतल्या असत्या तर एवढा मोठा संघर्ष उभाच राहिला नसता, असे मत राज ठाकरे यांनी व्यक्त केले. शेतकरी आंदोलन, मणिपूर आणि आदिवासींच्या प्रश्नांवरही (पान ४ वर)

मुंबई, पालघर, नाशकात पावसाने जनजीवन विस्कळीत

पुणे दि.२३ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रात अनेक भागात मान्सूनने रौद्र रूप धारण केले असून, सलग पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे राज्याच्या अनेक भागांत जनजीवन विस्कळीत झाले आहे. हवामान विभागाने पुण्याच्या घाटमाथ्यासाठी रेड अलर्ट, तर नाशिक, पालघरसह कोकणातील जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. अतिवृष्टीमुळे पालघर जिल्ह्यातील शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली असून, पुराच्या पाण्यामुळे १५ ते १६ गावांचा मुख्य संपर्क तुटला आहे. दुसरीकडे, मुंबईत रात्रभर पडलेल्या पावसामुळे तानसासह तीन तलाव ओसंडून वाहू लागले आहे.

गेल्या तीन दिवसांपासून पालघर जिल्ह्याला पावसाने अक्षरशः झोडपून काढले आहे. डहाणू आणि तलासरी तालुक्यांत पूरस्थिती निर्माण झाल्याने जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. मुसळधार पावसामुळे डहाणू ते विरार दरम्यानची लोकल सेवा पूर्णपणे ठप्प झाली आहे. सारणी-उर्से-ऐना या मुख्य रस्त्यावर पुराचे पाणी आल्याने, परिसरातील जवळपास (पान ४ वर)

पेपरफुटीतील दोषींना शिक्षा देण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करणार-पंतप्रधान

नवी दिल्ली दि.२३ (वृत्तसंस्था)- गेल्या ३४ दिवसांपासून नीट पेपर फुटीवरुन जंतर मंतरवरील विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरुच आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विद्यार्थी आंदोलन करत आहेत. सरकारसोबत विद्यार्थ्यांची अजून तरी यशस्वी चर्चा झाली नाही. याच दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज एक्सवर पोस्ट करत काँकरोच जनता पार्टीच्या आंदोलनावर भाष्य केलं आहे.

देशातील युवकांचे हित आणि त्यांचे भविष्य ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. पेपर लीकच्या सर्व प्रकरणांमध्ये दोषींना लवकरात लवकर कठोर शिक्षा देण्यासाठी आणि खटल्यांचा त्वरित निकालासाठी फास्ट ट्रॅक कोर्टाची स्थापना करण्यात येईल. यासंबंधी संबंधित विभागांनी आवश्यक कारवाई सुनिश्चित करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती नरेंद्र मोदी यांनी दिली. तसेच विद्यार्थ्यांच्या हितांचे संरक्षण करण्यासाठी सरकार घेत असलेल्या निर्णयांमध्ये हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. युवकांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला माफ केले जाणार नाही.

दिल्लीतील जंतरमंतरवरील काँक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनाची, गेल्या ३४ दिवसांपासून नीट पेपर फुटीवरुन जंतरमंतरवरील विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरुच आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विद्यार्थी आंदोलन करत आहेत. सरकारसोबत विद्यार्थ्यांची अजून तरी चर्चा झाली नाही. तर विद्यार्थी आंदोलनावर ठाम आहेत. त्यामुळे आंदोलनाची कोंडी कधी फुटते हे पाहावं लागेल.

हर्षवर्धन सपकाळांचा महायुती सरकारवर हल्लाबोल

२६ जुलैच्या आंदोलनाला काँग्रेसचा पाठिंबा

मुंबई दि.२३ (प्रतिनिधी)- विद्यार्थ्यांच्या आंदोलनावरून राज्यातील कायदा-सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित करत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्य सरकार आणि पोलिस प्रशासनावर जोरदार टीका केली. विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान पोलिसांकडून बळाचा वापर होत असल्याचा आरोप करत त्यांनी ठाकरे बंधुंनी घोषित केलेल्या २६ जुलै रोजीच्या होणाऱ्या आंदोलनाला काँग्रेसचा पाठिंबा असल्याचे स्पष्ट केले.

माध्यमांशी संवाद साधताना सपकाळ म्हणाले की, विद्यार्थ्यांचा आक्रोश, लोकशाहीचे संरक्षण आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासह विविध मागण्यांच्या पार्श्वभूमीवर देशभरातील तरुण रस्त्यावर उतरले आहेत. अशा परिस्थितीत पोलिसांनी नागरिकांचे संरक्षण करण्याऐवजी आंदोलकांवर दडपशाही सुरू केली असल्याचा आरोप त्यांनी केला.

सपकाळ म्हणाले की, अल्पवयीन विद्यार्थ्यांना ताब्यात घेतले जात आहे, त्यांना कोठडीत ठेवले जात आहे आणि त्यांच्या कुटुंबियांना माहितीही (पान ४ वर)

विद्यार्थी आंदोलकांबाबत पोलिसांची भूमिका लोकशाहीविरोधी-मुख्यमंत्री थलपती विजय

तिरूअनंतपुरम दि.२३ (वृत्तसंस्था)- सध्या देशात नीट पेपरफुटी प्रकरण आणि त्यावरुन केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करत कॉकरोच जनता पार्टीनं आंदोलन सुरू केलंय. आता हे आंदोलन देशातल्या गावाखेड्यांत पोहोचलं असून सर्वत्र याचे पडसाद पाहायला मिळत आहेत. अशातच, बहुतेकांनी या आंदोलनाला पाठींबा दिला आहे. तर, काहींनी आंदोलकांच्या विरोधात प्रतिक्रिया दिल्यात. अशातच सध्या आपल्या सडेतोड कामाच्या शैलीसाठी प्रसिद्ध असलेले तामिळनाडूचे मुख्यमंत्री थलपती विजय यांनीही विद्यार्थी आंदोलन आणि नीट परीक्षेतील घोटाळा यावर प्रतिक्रिया दिली आहे.

तमिळनाडूचे मुख्यमंत्री आणि तमिळगा वेत्री कळगमचे अध्यक्ष सी. जोसेफ विजय यांनी बुधवारी नीट पेपरफुटी प्रकरणावरुन सुरू असलेल्या देशव्यापी निदर्शनांबाबत आपली भूमिका मांडली. त्यांनी नवी दिल्लीत काँग्रेस नेते राहुल गांधी आणि इतर विरोधी पक्षनेत्यांना करण्यात आलेल्या अटकेचा निषेध केला. थलपती विजय यांनी विद्यार्थी आंदोलकांवरील पोलीस कारवाईचं वर्णन अलोकतांत्रिक असं केलंय. संसद मार्चमध्ये सहभागी झालेल्या आंदोलकांवरील पोलीस कारवाईनंतर, संसद परिसरात आंदोलन करणाऱ्या विरोधी पक्षांच्या पाठीशी आपला पक्ष ठामपणे उभा असल्याचं विजय यांनी ट्वीट करुन सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर प्रसिद्ध केलेल्या निवेदनात स्पष्ट केलं आहे. तसेच, नीट परीक्षेला आपला पक्ष ठामपणे विरोध करत असल्याचंही त्यांनी पुन्हा एकदा अधोरेखित केलंय.

थलपती विजय यांच्या टीव्हीके पक्षाने ट्विटरवर पोस्ट शेअर करत लिहिलं की, नीट परीक्षा लागू झाल्यापासून, केवळ त्या परीक्षेची विश्वासार्हता कमी झाली नाही, तर विद्यार्थ्यांना मानसिक तणावाचा सामना करावा लागत आहे आणि त्यांच्या भविष्यातील स्वप्नांवर मोठं प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

एखाद्या मंत्र्याचा राजीनामा घेतल्याने सरकारची सत्ता जाणार नाही; अण्णा हजारेंचे पीएम मोदींना पत्र

अहिल्यानगर दि.२३ (प्रतिनिधी)- नवी दिल्ली सह देशातील विविध शहरांमध्ये सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारेंनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवले आहे. "लोकशाहीत जनतेचा आवाज दडपून नव्हे, तर संवादातून प्रश्न सोडविण्याबाबत" असा या पत्राचा विषय असून, आंदोलनादरम्यान घडलेल्या हिंसाचाराच्या आणि पोलिसी कारवाईच्या बातम्या अत्यंत वेदनादायक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

अण्णा हजारेंनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, "नवी दिल्लीतील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर काल घडलेल्या हिंसाचाराच्या आणि पोलिसी कारवाईच्या बातम्या अत्यंत वेदनादायक आहेत. लोकशाही व्यवस्थेत अशा प्रकारच्या घटना घडणे कोणाच्याही हिताचे नाही. कोणत्याही परिस्थितीत हिंसा, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान किंवा अनावश्यक बळाचा वापर टाळला गेला पाहिजे, असे माझे ठाम मत आहे."

"आज देशातील लाखो तरुण पेपरफुटी, भरती प्रक्रियेतील विलंब, बेरोजगारी आणि इतर अनेक प्रश्नांमुळे अस्वस्थ आहेत. या अस्वस्थतेकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून न पाहता, ती समाजातील वेदना आणि अपेक्षा म्हणून समजून घेणे आवश्यक आहे. यापूर्वी २०२४ मध्ये नीट च्या परीक्षेचे पेपर फुटी व गोंधळ समोर आला. यावर्षी सुद्धा देशात २२ लाख विद्यार्थी या परीक्षेला बसलेल्या असताना पेपर फुटली. २२ मुलांनी निराश होऊन आत्महत्या केल्या. फेर परीक्षेच्या निकालांमध्ये मोठा गोंधळ झाला असल्याच्या बातम्या आहे. सरकारी कारभारामध्ये काही गैरकारभार उघडकीस आला की त्याची जबाबदारी खालच्या माणसांवर टाकायची आणि चांगलं जे असेल त्याच श्रेय सरकारने घ्यायचं हे योग्य नाही. वरिष्ठांची जनतेप्रती जबाबदारी व उत्तरदायित्व आहे," असे त्यांनी म्हटले आहे.

दिल्लीतील लाठीचार्जचा सिंदेवाहीत तीव्र निषेध:हे विद्यार्थ्यांच्या जीवावर उठलेले निष्ठूर सरकार, विजय वडेट्टीवार यांची सडकून टीका

नागपूर दि.२३ (प्रतिनिधी)- दिल्ली येथील जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर झालेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ सिंदेवाही येथे काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व विधिमंडळ पक्षनेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी केले. यावेळी केंद्र सरकारच्या धोरणांवर कडाडून टीका करत त्यांनी, "हे सरकार शेतकरी आणि विद्यार्थ्यांच्या जिवावर उठणारे निष्ठूर सरकार आहे. लोकशाही मार्गाने न्याय मागणाऱ्यांना लाठ्यांनी उत्तर देणारे सरकार लोकशाहीच्या मूल्यांवर घाला घालत आहे," असा घणाघाती आरोप केला.

पुढे बोलताना आमदार वडेट्टीवार म्हणाले की, देशाचे भविष्य घडविणाऱ्या विद्यार्थ्यांवर लाठीमार करून त्यांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न केला जात आहे. जनतेच्या प्रश्नांना उत्तर देण्याऐवजी आंदोलनकर्त्यांवर बळाचा वापर करणे हे कोणत्याही लोकशाहीला शोभणारे नाही. सरकारने संवादाचा मार्ग स्वीकारण्याऐवजी दडपशाहीचा मार्ग स्वीकारला असून, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.

दिल्लीतील जंतर-मंतरवर न्याय, हक्क आणि विविध मागण्यांसाठी शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर करण्यात आलेला लाठीचार्ज हा लोकशाहीवरील काळा डाग असल्याचे सांगत त्यांनी या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध केला. आंदोलकांवर बळाचा वापर करून त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न हा संविधानाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकारालाच आव्हान असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या वाढत्या अडचणी, पिकांना न मिळणारा हमीभाव, वाढती उत्पादनखर्चाची समस्या, बेरोजगारी, शिक्षण क्षेत्रातील प्रश्न, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीतील विलंब आणि ग्रामीण भागातील शैक्षणिक सुविधांची दुरवस्था याकडे लक्ष वेधले. "सरकार जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करत आहे. शेतकरी संकटात आहे, विद्यार्थी भविष्याबाबत चिंतेत आहे, तर बेरोजगार युवक रोजगारासाठी भटकत आहे. मात्र सरकारला या प्रश्नांपेक्षा प्रसिद्धीची अधिक चिंता आहे," असा आरोप त्यांनी केला.

आमदार वडेट्टीवार यांनी सरकारला इशारा देताना सांगितले की, शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर तातडीने ठोस निर्णय घेण्यात यावेत. अन्यथा काँग्रेस पक्ष राज्यभर जनआंदोलन उभारून सरकारला जनतेच्या न्याय्य मागण्या मान्य करण्यास भाग पाडेल.

राहुल गांधींनी पळपुटेपणा सोडून संसदेत चर्चेला यावे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे आव्हान

मुंबई दि.२३ (प्रतिनिधी)- नीट पेपर लीक प्रकरणावरून सुरू असलेल्या राजकीय संघर्षात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी आणि विरोधी पक्षांवर जोरदार टीका केली. विरोधकांनी रस्त्यावर आंदोलन करण्याऐवजी संसदेत येऊन चर्चा करावी, असे खुले आव्हान देत त्यांनी विद्यार्थ्यांच्या नावावर राजकारण करू नये, असेही म्हटले.

फडणवीस म्हणाले, "राहुल गांधी यांच्यात खरोखर हिंमत असेल, लोकशाही आणि संविधानावर विश्वास असेल तर त्यांनी संसदेत चर्चा करावी. चर्चेची सर्वात महत्त्वाची जागा संसद आहे. मग चर्चेपासून पळ का काढता? कारण तुमची पोलखोल होईल, याची तुम्हाला भीती वाटते."

त्यांनी पुढे काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांच्या सरकारांचा उल्लेख करत, "कर्नाटक, तेलंगणा आणि राजस्थानमध्ये काँग्रेसच्या सत्ताकाळात आठ वेळा पेपर लीक झाले. पंजाबमध्येही आम आदमी पक्षाच्या सरकारमध्ये पेपर लीकची प्रकरणे घडली. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून राजकारण करणे बंद करा," असा आरोप केला.

मुख्यमंत्री म्हणाले की, विरोधकांकडे काही प्रश्न किंवा सूचना असतील तर त्या संसदेत मांडाव्यात. "सरकारला योग्य निर्णय घेण्यासाठी मजबूर (पान ४ वर)

संतांची पंढरी

आकाशगंगा, सूर्य, चंद्र, तारा आणि या ताऱ्यात अवघा महाराष्ट्र झळकतोय सारा. निसर्ग सौंदर्याने बहरलेला, बुद्धिवंतांच्या चातुर्याने रंगलेला, साधुसंत, महंत, कलाकार यांची कर्मभूमी असलेला भगवा महाराष्ट्र नवोन्मेषशाली आविष्काराचं भूषण आहे. महाराष्ट्रात भागवत धर्माची पताका संत नामदेव, संत एकनाथ महाराज, संत ज्ञानेश्वर माऊली, संत चोखामेळा, संत गोरा कुंभार, संत सावतामाळी, संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या लेखणीतून अवतरली. त्यांनी अभंग, कीर्तनाच्या माध्यमातून ती पुढे चालवली. ही अद्भुत सामंजस्याची दिंडी उभारताचं दिंडीतून वारी घडली. वारी म्हणजे अभिगमनाचा एक उपासना वर्ग होय. आज शेकडो वर्षांचा इतिहास मागे ठेऊन जाणाऱ्या दिंड्या मैलोनमैल मार्गस्थ होत पाहताना आपल्याला स्फुरण चढतं. 'धाव विठ्ठला धाव पाव विठ्ठला' म्हणत आपण त्याला पुकारतो. आश्वासक प्रेरणा घेऊन उभी ठाकलेली दिंडीतील वारकऱ्यांच्या मनातली परमेश्वरा विषयीची भक्तीपर ओढ असावी. जग प्रवाहाच्या उलट दिशेने जायला संतांकडे शिकल्याने वारी परंपरा माऊली शब्द व्युत्पत्ती स्थितीची ओळख घडवतो. यामुळे भरीव बदल साधण्याचं काम साध्य होतं. इतर ज्येष्ठ संतांबरोबर संत कान्होपात्रा, मुक्ताबाई, जनाबाईसारख्या संत स्त्रियांनी आपले मुक्त विचार परखडपणे मांडले. त्या काळात स्त्री संताचा हातभार हा मुख्यतः भक्तीचा कळस गाठून कौशल्य पणाला लावण्याचं कसबी काम होतं. खरा तोचि संत सोशी जगाचे आघात म्हणत माझ्याकरिता मी नसून मी या लोकांकरिता आहे तसचं माझ्याकरिता जग नसून मी या जगाकरिता आहे असे मानणारे संत या भूमीत जन्मले.

सध्या पावसाच्या सरीला मागे टाकत आषाढवारीचे दिवस जोर धरू लागलेत. देवाच्या भेटीगाठीसाठी निघालेल्या भक्त आणि वारकऱ्यांच्या दिंड्या या धार्मिक यात्रा नव्हेत, तर त्या आहेत एका मानवतेशी जोडलेल्या समतेच्या ओल्या मातीच्या जिवंत सेवाभावी परंपरा पुढे घेऊन जाणाऱ्या एकनिष्ठ दिंड्या. ज्या पंढरपूर वारीत एकमुखी नामाने ज्ञानोबा माऊली तुकारामाचा गजर जगण्याची दिशा निश्चित करतात. हजारो, लाखो वारकरी तहानभूक विसरून घोषनाम संकीर्तनातून भक्तिभाव समानतेचा संदेश पंढरीच्या वाटेवरती तल्लीन होऊन सोडून देतात. आपल्या संतांच्या किमयागार बुद्धीची कल्पना करून पाहा! बरंच काही मागे ठेऊन जाताना बंधुता सेवाभावाच्या वारीत ते जोडले गेलेत. जोडण्याची जिवंत परंपरा म्हणजे आषाढ, कार्तिक वारी होय. तहानभूक विसरून लाखोंच्या संख्येने मुखी विठूचा गजरासह, नाम संकीर्तनाची आस तसेच मनात भरलेला भक्तिभाव, समानतेचा संदेश देत पावलं पंढरपुरीस ओढली जातात. माऊलीच्या भेटीची एकचं आस आणि एकचं ध्यास बाळगत वातावरण माऊलीमय होऊन जातं. वारीत सगळे माऊली होऊन जगतात आणि जगायला शिकवितात. वारकरी संप्रदायात स्त्री-पुरुष गरीब श्रीमंतीचा भेदभाव संपुष्टात आलेला असतो. काळाबरोबर समाजाची मानसिकता बदलत असली तरी वारीत परस्पर प्रेम, सहकार्याची भावना आणि सन्मानावर भर म्हणजे त्रिसूत्रीचा आदर होताना दिसतो. संत शिकवणुकीचा अध्याय पाळला जातो. समाजाला सत्याची ओळख करून देण्यात संतांनी आपलं सर्वस्व पणाला लावलं असल्याने पंढरपूरची वाट दाखवणारे पुण्यवान संत आपल्यात नसले तरी आपल्या स्मरणात ते आजही आहेत. थोर संत सहवास याहून भाग्य दुसरे नाही खास. भारताला विशेषतः या महाराष्ट्राला संतांची मोठी गौरवशाली परंपरा लाभल्याने महाराष्ट्राची भूमी संतभूमी म्हणून ओळखली जाते ती याचं कारणास्तव. रत्नांच्या खाणीतून साहित्य संस्कृतीचा पाया रचला गेला. संतांच्या शिकवणुकीतून महाराष्ट्र चिंतनशील बनला. समाज प्रवर्तक सकारात्मक विचारांनी प्रामाणिक, बुद्धिवादी झाला. या पोषक वातावरण जात, पात, धर्म, पंथ, भाषा, परंपरा, साहित्य, संस्कार, वैचारिक जडणघडण बदलत गेली, जेणेकरून आपला थोर सांस्कृतिक वारसा पुढे गेला. या भूमीवर प्रत्यक्ष देवाधिदेवाला अनुभवणं कठीण असल्याने संतांना चालते बोलते देव म्हटले जाते ते याच कारणासाठी. ज्याचे चित्त वित्त भगवंताकडे असते, या गूढ मापदंडात जो बसतो तो खरा संत ठरतो हीच त्यांची ओळख ठरते, अशा शाश्वत सत्याची ओळख करून देणारी मराठी महाराष्ट्रातील संत परंपरा समृद्ध आणि महान आहे.

संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव आणि संत एकनाथ यांसारख्या संतांनी मानवतेचा सहिष्णुता धर्म शिकवला. विविध अभंग, ओव्या, कीर्तन, भजन, भारूडातून सामाजिक समता प्रस्थापित केली, अंधश्रद्धा व जातीभेद दूर करत समाज प्रबोधन केले. संतांनी जगातली राज्ये मिळवली नाहीत पण त्यांनी जगावर राज्य केले म्हणून संतांना चालते फिरते ईश्वररूप मानले गेले. संतांचा भावुक दयाळूपणा अवगत करून आपले अवगुण घालवण्याचा सोपा उपाय संत संगतीत प्राप्त झाल्याने ना केवळ त्यांनी स्वतःचाच उद्धार केला, तर समस्त समाजाला भक्तीचा, प्रेमाचा आणि मानवतेचा मार्ग दाखवला, धर्म सांगितला. थोर संत शिकवण मानवी मूल्यावर आधारित असल्याने केवळ आज्ञा पालन करणे म्हणजे संतसेवा करणे नव्हे त्यावर तसे वागणे हा झाला शिरस्ता. संत लिखाणातल्या अभंगांतून ईश्वर सर्वांचा आहे हा संदेश स्पष्टपणे व्यक्त होतो, त्यामुळे पंढरीची वारी समाजातील भेदभाव मिटवणारी, माणुसकीची नाती दृढ करणारी अद्वितीय परंपरा ठरत आहे. काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल, नांदतो केवळ, नांदतो केवळ पांडुरंग, काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल! कायम त्याच्या अवतीभवती फिरणारं शरीर पंढरपूर होतं तर अंतरंग विठ्ठलवासाने भरून पावतं. त्याच्यावरील अढळ श्रद्धेतून भक्ती जोम धरू लागते. या निर्गृण निराकाराची उपासना प्रत्येकाला जमेलच असं नाही. पण त्यातील सगुण उपासना म्हणजे भक्ती भगवंताचे रूप मानून मनात ठसवतो. मग वारीला निघताना देहभान विसरायला लावणाऱ्या अंतःकरणातील त्याच्या रूपाचा ध्यास वाढतो आणि कधी पाहिन त्या सर्वस्व रूपाला भाव प्रकट होतो. सर्वसामान्यांना ज्ञान नको असते तर दैनंदिन जीवनात एक आधार हवा असतो. आधार व्यक्तिनिष्ठ असल्याने त्याची उपासना होते. मानवी जीवन समस्याग्रस्त झाल्यावर ईश्वर हाच एक आधार असतो. ज्ञान आणि भक्ती एका नाण्याच्या दोन बाजू असल्याने ज्ञान दानाच्या ठिकाणी भक्तीची ओढ असायला पाहिजे अशी शिकवण देणारे संत आपल्या महाराष्ट्रात जन्मले आहेत. ज्यांनी या महाराष्ट्राचा विकास साधला. नुसती भक्ती अंधश्रद्धेला वाव देते पण ज्ञानयुक्त भक्तीतून डोळस श्रद्धा वाहू लागते ही शिकवण आपल्या संतांनी शिकवल्यामुळे ज्ञानमार्गाने जाणाऱ्या संत तत्त्वज्ञानाला भक्तीची जोड मिळता अध्यात्मिक प्रगतीची वाटचाल जोमाने होते. संतांच्या ग्रंथांचा अर्थ कृतीनेच कळतो. साहित्याची सेवा घडताना भाषेची सेवा करायला संत विसरले नाहीत. शुभदिनी शुभप्रसंगी भाषेचा करू सन्मान, माझी मायबोली मराठी महान. मायेचा नाद प्रसवणारी मायबोली म्हणजे मराठी भाषा अनंत शाखांनी बहरली. तिच्या शब्दातले कोमल भाव गारूड घालतात मनावर. भाषा म्हणजे अभिव्यक्त होण्याचं माध्यम. या हृदयीचे त्या हृदयाला पोहोचवण्याचं सामर्थ्य म्हणजे भाषा.

मातेसमान प्रिय असणाऱ्या मधुर भाषेला संत तुकाराम महाराजांच्या शब्दात सांगायचं झालं तर, शब्दची आमुच्या जीवनाचे जीवन" शब्द वाटू धन जन लोका"

गतीमान मराठी भाषेच्या व्युत्पत्तीमुळे या जीवनात क्रांतीपूर्ण बदल झाले. सातवाहनांच्या काळात देवतांचा स्तुतीपर असलेल्या वारकरी संप्रदायातील संत तुकाराम महाराजांच्या गाथा याचं कारणास्तव प्रसिद्ध झाल्या. संस्कृत भाषेनंतर सामान्यांची प्राकृत भाषा नावारूपाला आली. संत ज्ञानेश्वर महाराज लिहिते झाले. त्यावेळच्या समकालीन संतांनी ती भाषा पुढे नेली. आपल्या प्राकृत भाषेत मराठीचा गौरव करणारे ज्ञानेश्वर माऊली सांगतात. माझा मराठीची बोलू कौतुके, परि अमृतातेंही पैजासि जिंके, ऐसीं अक्षरें रसिकें, मेळवीन, संत ज्ञानेश्वरांनी मराठीत भगवद्गीतेची टीका लिहून नव्या साहित्य पर्वाची सुरुवात केली. समाजाला वैचारिकतेची वाट दाखवत अज्ञान अंधकाराच्या कोषातून बाहेर काढले. त्यातून ज्ञानेश्वरीसारखा अमूल्य ठेवा महाराष्ट्राला लाभला. महाराष्ट्र भूमीच्या उत्कर्षासाठी संत वचनातील परीपूर्ण मार्गदर्शक तत्त्व उपयोगी पडली. संत ज्ञानेश्वरानंतर संस्कृत भागवतपुराण ग्रंथ मराठीत लिहणारे संत एकनाथ यांनी भावार्थ रामायण मराठीत आणले. त्यावेळेच्या मौखिक भाषेपेक्षा लिखित साहित्य अमर असल्याने मराठी सण उत्सव, व्यवहार संबंधित गोष्टी सर्व पातळ्यांवर राबविल्या गेल्या. संतांची महती थोर आहे. अशी थोर पुण्य संत परंपरा महाराष्ट्राला लाभली. त्यांचे अस्तित्व देहात नसून त्यांच्या वचनात असल्याने आपण त्या वचनाशी बांधिल आहोत. संत जसे बोलतात तसेच वागतात. समृद्धीच्या काळात मन कौमुदी कमळ पाकळ्यांप्रमाणे नाजूक असलेले संत अति कठीण परिस्थितीत पर्वतासारखे महाकाय होतात हे मान्य करता परिस धातूपेक्षा संतांचे महत्त्व अधिक जाणावे कारण परिस लोखंडाचे सोने करतो तर संत सामान्यांचे असामान्य भल्या सूज्ञ माणसात रूपांतर करतात. आत्मज्ञान, सद्गुण, भक्तीमार्ग ज्यांनी अनुभवलेला असतो तोच खरा संत होय. थोर संत विषयात देव पाहातात तर आपण देवात विषय पाहतो हा फरक असल्याने काम, क्रोध, मद, मोह, मत्सर जिथं संपतो तिथं संत जन्माला येतात. संतांचे विचारकार्य हे मानवी जीवनाला योग्य दिशा देणारे असल्याने त्यांनी दिलेल्या नैतिक मूल्यांमधून महाराष्ट्रात समूळ संस्कृतीचे उत्तम संस्कार जनमानसावर झालेले आहेत. संतांचे कार्य पिढ्यान पिढ्या संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी राहील.

पावसाळ्यात पोटाचे संक्रमण टाळा

पावसाळ्यात, दमटपणा आणि साचलेल्या पाण्यामुळे जीवाणू, विषाणू आणि बुरशी यांची झपाट्याने वाढ होते. पाण्याचे स्रोत सहजपणे दूषित होऊ शकतात आणि दमट हवेमुळे अन्न लवकर खराब होते. त्याच वेळी, या हवामानात आपली पचनक्रिया मंदावते, ज्यामुळे पोट अधिक संवेदनशील बनते. दूषित पाणी आणि अन्नातील जंतू यांमुळे पोटाचे विकार, अन्नविषबाधा, जुलाब, उलट्या आणि कावीळसारख्या आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे या दिवसांत खाण्यापिण्याच्या सवयींकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. अन्नसुरक्षेचे नियम पाळण्याबरोबरच रोगप्रतिकारशक्ती मजबूत ठेवली, तर अनेक संसर्गजन्य आजारांपासून संरक्षण मिळू शकते. सुरक्षित पाणी आणि ताजे अन्न महत्त्वाचे पावसाळ्यात नेहमी उकळलेले, गाळलेले किंवा शुद्ध केलेले पाणीच प्यावे. बाहेर मिळणारे पाणी वापरणे टाळावे. घराबाहेर जाताना स्वतःची पाण्याची बाटली बरोबर ठेवणे ही चांगली सवय आहे.

रस्त्यावरील उघडे खाद्यपदार्थ, आधीच कापलेली फळे आणि सॅलड खाणे शक्यतो टाळावे. घरचे ताजे आणि गरम अन्न हा सर्वात सुरक्षित पर्याय ठरतो. शिळे किंवा दीर्घकाळ साठवलेले अन्न खाणे टाळावे. अन्नाच्या गुणवत्तेबाबत शंका असल्यास ते फेकून देणे अधिक योग्य ठरते.फळे-भाज्या स्वच्छ धुवा पालेभाज्या आणि फळांवर चिखल, जंतू किंवा सूक्ष्म कीटक असू शकतात. त्यामुळे त्या वाहत्या पाण्याखाली नीट धुवाव्यात. शक्य असल्यास काही वेळ मिठाच्या पाण्यात भिजवून ठेवाव्यात. भाज्या कच्च्या खाण्याऐवजी शिजवून खाल्ल्यास संसर्गाचा धोका कमी होतो. स्वयंपाकघराची स्वच्छता आवश्यक दमट वातावरणामुळे स्वयंपाकघरात जंतू आणि बुरशी वाढण्याची शक्यता अधिक असते. स्वयंपाकाची जागा, भांडी आणि अन्नसाठा स्वच्छ व कोरडा ठेवावा. अन्न नेहमी झाकून ठेवावे आणि कोरडे पदार्थ हवाबंद डब्यांत साठवावेत.प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी काय कराल? मजबूत रोगप्रतिकारशक्ती शरीराला संसर्गाविरुद्ध लढण्यास मदत करते. त्यामुळे आहारात जीवनसत्त्वांनी समृद्ध मोसमी फळे, भाज्या, लिंबूवर्गीय फळे, आवळा, आले, लसूण, हळद आणि तुळस यांचा समावेश करावा. गरम सूप, हर्बल चहा आणि ताजे, पचायला हलके घरगुती अन्न अधिक लाभदायक ठरते.पावसाळ्यात तहान कमी लागत असली तरी पुरेसे पाणी पिणे आवश्यक आहे. कोमट किंवा सामान्य तापमानाचे पाणी आणि हर्बल पेये शरीरातील पाण्याचे संतुलन राखण्यास मदत करतात.नियमित हलका व्यायाम, पुरेशी झोप आणि तणावमुक्त जीवनशैलीही प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी महत्त्वाची आहे. तसेच हात वारंवार धुणे, पावसात भिजल्यानंतर लगेच कोरडे कपडे घालणे आणि परिसर स्वच्छ ठेवणे या सवयींमुळे संसर्गाचा धोका कमी होतो.

कोणती लक्षणे धोक्याची?

काही वेळा योग्य काळजी घेऊनही संसर्ग होऊ शकतो. सतत उलट्या किंवा जुलाब, न उतरणारा ताप, तीव्र पोटदुखी, निर्जलीकरण, डोळे किंवा त्वचा पिवळी पडणे आणि तीव्र अशक्तपणा अशी लक्षणे दिसल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि कमी प्रतिकारशक्ती असलेल्या व्यक्तींनी विलंब न करता उपचार घेणे आवश्यक आहे. पावसाळ्यातील काही साध्या सवयीङ्कसुरक्षित पाणी, स्वच्छ अन्न, चांगली स्वच्छता आणि संतुलित आहारङ्कयांचे पालन केल्यास पोटाचे संक्रमण आणि इतर मोसमी आजारांपासून मोठ्या प्रमाणात संरक्षण मिळू शकते.

महाराष्ट्र सायबर सेल कात टाकणार

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी) - वाढत्या सायबर गुन्ह्यांवर वेगाने नियंत्रण मिळवण्यासह तंत्रज्ञानावर आधारित तपासाला अधिक बळ देण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. केंद्रीय सायबर गुन्हे समन्वय केंद्राच्या धर्तीवर आता महाराष्ट्र सायबर कार्यालयाला 'राज्य सायबर गुन्हे समन्वय केंद्र' म्हणून घोषित करण्यात आले आहे.

केंद्रीय गृह मंत्रालयाने जून २०२६ मध्ये दिलेल्या निर्देशांनुसार, राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पाची तांत्रिक, संस्थात्मक आणि कार्यकारी क्षमता लक्षात घेऊन राज्य सायबर कार्यालयाची ही नवी रचना निश्चित करण्यात आली आहे. या नव्या रचनेमुळे सायबर गुन्ह्यांचा तपास, आपत्कालीन यंत्रणा, जनजागृती आणि सुरक्षा या सर्व बाबी एकाच छताखाली आणि अधिक सुटसुटीत पद्धतीने चालणार आहेत. या केंद्राच्या कामाकाजासाठी आठ मुख्य कार्यात्मक विभाग निश्चित करण्यात आले आहेत. या अंतर्गत नोडल सायबर पोलीस ठाण्याकडे सायबर तपास विभागाची तर 'टेक्नॉलॉजी असिस्टेड इन्व्हेस्टिगेशन'कडे डिजिटल तपास मदत केंद्राची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

प्रशिक्षण आणि संशोधनासाठी 'सेंटर ऑफ एक्सलन्स'च्या माध्यमातून सायबर गुन्हे प्रशिक्षण केंद्र आणि सायबर संशोधन-नाविन्यता युनिट चालवले जाईल. आपत्कालीन प्रतिसाद आणि मदतीसाठी कमांड अँड कंट्रोल सेंटरमार्फत '१९३०' ही हेल्पलाइन चालवली जाणार असून, 'महा ग्रीड'द्वारे सायबर फसवणूक प्रतिबंधक केंद्र आणि इमर्जन्सी रिस्पॉन्स डिव्हिजन'द्वारे आपत्कालीन प्रतिसाद विभाग सांभाळला जाईल. याशिवाय महिला आणि बालकांवरील ऑनलाईन गुन्हे रोखण्यासाठी विशेष कक्ष कार्यरत राहणार आहे, तर सोशल मीडियावरील संशयास्पद घडामोडींवर आणि सायबर धोक्यांवर नजर ठेवण्यासाठी स्वतंत्र विभाग काम करेल. या निर्णयामुळे राज्यातील सायबर गुन्ह्यांशी लढा देण्यासाठी यंत्रणेला अधिक गती मिळणार असून पोलीस आणि प्रशासकीय समन्वयात मोठा सुधार होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

विशेष मुलाखत: मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम; प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक- जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.

छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- अचूक मतदार यादी ही लोकशाहीचा मजबूत पाया आहे. प्रत्येक पात्र नागरिकाने विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा. आपल्या घरी येणाऱ्या बी.एल.ओ. यांना सहकार्य करावे, आवश्यक माहिती व कागदपत्रे वेळेत उपलब्ध करून द्यावीत आणि स्वतःचे नाव मतदार यादीत योग्यरीत्या समाविष्ट असल्याची खात्री करावी. मतदारांच्या सहकार्यानेच लोकशाही अधिक सक्षम बनवेल. प्रत्येक पात्र मतदाराची मतदार यादीत नोंद होईल आणि कोणत्याही अपात्र व्यक्तिच्या नावाचा समावेश होणार नाही,असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.

मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाविषयी मतदारांच्या मनात असलेले विविध प्रश्नांवर जिल्हाधिकारी गौडा यांच्याशी चर्चा केली. सदर मुलाखत आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर केंद्रावरुन दि.२३ जुलै २०२६ रोजी प्रसारीत झाली आहे. वाचकांसाठी ही मुलाखत सादर करीत आहोत.

१. मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण (एस. आय.आर.) हा उपक्रम का राबविण्यात येत आहे?

जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.- राज्यातील विधानसभा मतदार संघाच्या मतदार याद्या दोषविरहीत व अचूक करण्यासाठी नव्याने मतदार याद्या तयार करणे म्हणजेच विशेष सखोल पुनरिक्षण होय. सन २००२-२००४ याकालावधीत देशात या आधीचे मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण करण्यात आले होते. त्यानंतर वाढते शहरीकरण,नागरिकांचे स्थलांतरण, मतदारांचा मृत्यु, दुबार नावे इत्यादी कारणांमुळे मतदार याद्या नव्याने तयार करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यामुळे पुर्ण देशामध्ये हा कार्यक्रम टप्प्याटप्प्याने राबविण्यात येत आहे.

२.किती वर्षांनी हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे?

जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.- भारत निवडणूक आयोगा मार्फत या पुर्वी सन १९५२-५६, १९५७, १९६१, १९६५, १९६६, १९८३-८४, १९८७-८९, १९९२, १९९३, १९९५, २००२, २००३ व २००४ मध्ये विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात आले आहे. थोडक्यात,हा नियमित व ठराविक कालावधीने राबविण्यात येणारा उपक्रम आहे.

३. एरवीही मतदार याद्यांचे पुनरिक्षण राबविले जाते. त्यात आणि ह्या एस.आय आर.नेमका फरक काय आहे?

जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.- सामान्य पुनरीक्षण कार्यक्रम मध्ये प्राप्त अर्जांवर कार्यवाही केली जाते. मात्र एस.आय.आर. मध्ये गृहभेटी घेऊन प्रत्येक मतदाराची प्रत्यक्ष पडताळणी केली जाते. यामुळे मतदार यादीची अचूकता अधिक वाढते.

४. या उपक्रमासाठी निवडणूक आयोगाने कालबद्ध कार्यक्रम दिला असेल. त्या वेळापत्रकाविषयी सांगा.

जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.- एस.आय.आर. हा कार्यक्रम महाराष्ट्रात दि. ३० जून ते १९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येत आहे.

त्याचे सविस्तर वेळापत्रक याप्रमाणे-

अ. बी.एल.ओ. द्वारे घरभेटी आणि गणना प्रपत्र भरणे- दि.३० जून ते ८ ऑगस्ट

ब.मतदान केंद्रांचे सुसुत्रीकरण / पुनर्रचना- दि.८ ऑगस्ट २०२६.

क.प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करणे- दि.१७ ऑगस्ट २०२६.

ड.दावे आणि हरकती स्वीकारण्याचा कालावधी- दि.१७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर २०२६.

इ.नोटीसा देणे आणि दावे/हरकतींवर कार्यवाही करणे- १७ ऑगस्ट ते १५ ऑक्टोंबर २०२६.

ई.अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करणे- दि.१९ ऑक्टोंबर २०२६

५. या पुनरिक्षणाची शेवटची तारीख म्हणजे १ ऑक्टोबर २०२६ रोजी ज्यांचे वय १८ वर्षे पूर्ण होईल

त्यांचेही नाव मतदार यादीत नोंदविता येईल का?

जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.- होय. भारत निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या अर्हता दिनांकानुसार दि.१ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी १८ वर्षे पूर्ण करणारे नागरिक आवश्यक कागदपत्रांसह मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी अर्ज करू शकतात.

६. मतदारांच्या वयानुसार काही गट करण्यात आले आहेत का? (वय वर्षे ७० ते ८०, ६० ते ७० किंवा १८ ते २५ वगेरे)

आणि त्यानुसार काही वेगळे पुरावे देण्याची आवश्यकता आहे का?

जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.- ज्या मतदारांचे मॅपिंग (मतदार यादीतील संदर्भ जुळणी) होऊ शकत नाही, त्यांना त्यांच्या वयानुसार आयोगाने विहित केलेल्या पुराव्यांपैको एक वैध पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

म्हणजे-

अ) दि.१ जुलै १९८७ पुर्वी चा जन्म असेल तर स्वतःचा पुरावा.

ब) दि.१ जुलै १९८७ ते २ डिसेंबर २००४ दरम्यानचा जन्म असेल तर स्वतःचा व आई किंवा वडीलांचा पुरावा.

क)दि.२ डिसेंबर २००४ नंतरचा जन्म असेल तर स्वतःचा आणि आई व वडील दोघांचा पुरावा.

७.पुनरिक्षणासाठी मतदारांकडे कोणती कागदपत्रे उपलब्ध असणे आवश्यक आहे?

जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.- मतदाराची पात्रता सिद्ध करण्यासाठी खालील १२ पैकी कोणताही एक वैध पुरावा पुरेसा आहे:

अ) केंद्र/राज्य शासन किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांनी जारी केलेले ओळखपत्र किंवा निवृत्तीवेतन देयक आदेश.

ब) १ जुलै १९८७ पूर्वी शासन, बँका किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांनी जारी केलेले कोणतेही ओळखपत्र किंवा प्रमाणपत्र / दस्तऐवज.

क) सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जन्म दाखला.

ख) पासपोट.

ग) मान्यताप्राप्त शिक्षण मंडळ किंवा विद्यापीठाने जारी केलेले मॅट्रिक उत्तीर्ण प्रमाणपत्र किंवा इतर शेक्षणिक प्रमाणपत्र.

घ)सक्षम राज्य प्राधिकाऱ्याने जारी केलेले कायमस्वरूपी निवासी प्रमाणपत्र.

त) वनहक्क प्रमाणपत्र.

थ)सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र.

द) लागू असल्यास, राष्ट्रीय नागरिक नोंदणी मधील नोंद.

ध)कोणत्याही वैधानिक अथवा प्रशासकीय तरतुदींनुसार शासकीय अधिकाऱ्यांकडून संधारित करण्यात येणारी कुटुंब नोंदवही.

प)शासनाने जारी केलेले जमीन किंवा घर वाटप प्रमाणपत्र.

फ) आधार कार्ड (केवळ ओळख सिद्ध करण्यासाठी).

८. या प्रक्रियेसाठी जिल्हा प्रशासनाने कशी तयारी केली आहे? आणि आतापर्यंत किती काम पूर्ण झाले आहे?

जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.- जिल्ह्यात प्रत्येक मतदान केंद्रासाठी एक या प्रमाणे एकूण ३२६४ मतदान केंद्राच्या भागासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बी.एल.ओ.) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यात साधारणपणे एका बी.एल.ओ. यांना ८०० ते १००० मतदारांपर्यंत म्हणजेच २०० ते २५० घरांपर्यंत जायचे आहे. प्रत्येक १० मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचे मागे एक सुपरवायझर या प्रमाणे ३२६ सुपरवायझर नियुक्त करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्या मदतीसाठी ४०४७ सहायक नियुक्त करण्यात आले आहे. याशिवाय मतदारांच्या माहिती व मदतीसाठी प्रत्येक मतदार नोंदणी अधिकारी यांचे कार्यालयात व जिल्हाधिकारी कार्यालयात मतदार मदत कक्ष स्थापन करण्यात आले आहे. जिल्ह्यात मतदारांसाठी १९५० हा टोल फ्री क्रमांक सुरु करण्यात आला आहे. या प्रक्रियेसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज आहे.

सद्यस्थितीत जिल्ह्यात ७६.३६ ङ्क मतदारांच्या नावांची मागील एस.आय.आर मधील नोंदींशी जुळवणी करण्याची कार्यवाही यापूर्वीच यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहे. ७९.६७ ङ्क मतदारांचे गणना प्रपत्र वाटप करण्यात आले आहेत. ४९.५०ङ्क मतदारांचे गणना प्रपत्र ऑनलाईन भरण्यात आले आहे. उर्वरित मतदारांच्या पडताळणीसाठी घरभेटीची प्रक्रिया सुरू आहे.

९. किती मनुष्यबळ या कामासाठी सध्या काम करीत आहे?

जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.- सध्या नऊ मतदार नोंदणी अधिकारी, ९० सहायक मतदार नोंदणी अधिकारी, ३२६ सुपरवायझर, ३२६४ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी, ४०४७ सहायक मतदान केंद्रस्तरीय अधिकारी असे एकूण ७७३६ अधिकारी व कर्मचारी जिल्ह्यात एस. आय.आर. चे काम करत आहे.

१०. मतदारांच्या घरी गेल्यावर बी.एल.ओ. यांनी कोणती प्रक्रिया करणे अपेक्षित आहे व मतदारांनी त्यांना काय माहिती व कागदपत्रे दिले पाहिजे?

जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.- बी.एल.ओ. घरभेटीसाठी आले असता मतदारांनी बीएलओ यांनी दिलेले गणना प्रपत्र वरील आपल्या माहितीची खातरजमा करावी. मतदारांकडे २००२ चे मतदार यादीबाबत माहिती उपलब्ध असल्यास माहिती गणना प्रपत्र मध्ये भरण्यासाठी बी.एल.ओ. यांना उपलब्ध करून द्यावी. व सध्याची माहिती गणना प्रपत्र मध्ये भरून माहिती बरोबर असल्याची खात्री पटल्यावर प्रपत्रावर स्वाक्षरी किंवा डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा उमटवावा. व भरलेल्या अर्ज बी.एल.ओ. यांना द्यावा व त्याच्या एका प्रतिवर बी.एल.ओ. यांची पोच घेऊन स्वतःकडे जतन करून ठेवावी.

११. अनेक लोक स्थलांतर करतात, शिक्षण-नोकरीसाठी विदेशात किंवा परप्रांतात जातात, अशा लोकांबाबत काय प्रक्रिया राबविली जाईल?

जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.-स्थलांतर दोन प्रकारचे असतात. तात्पुरते स्थलांतर व कायमस्वरुपी स्थलांतर. तर तात्पुरते स्थलांतर केलेल्या व्यक्ती कामासाठी काही काळाकरिता बाहेर असल्यास कुटुंबातील कोणताही प्रौढ सदस्य त्यांच्या वतीने गणना प्रपत्र भरून देऊ शकतो. आणि कायमस्वरूपी स्थलांतर केलेली व्यक्ती असल्यास तिची नोंद आढळत नाही या प्रवर्गात कायम स्थलांतरीत म्हणून केली जाईल आणि तिचे नाव प्रारूप यादीत समाविष्ट होणार नाही.

१२. लग्न झालेल्या मुलींच्या बाबतीत या प्रक्रियेत काय तरतूद आहे?

जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.- विवाहित महिलेचे आडनाव बदलले असल्यास तिचे मॅपिंग नवीन आडनावाने केले जाऊ शकते. प्रणालीमध्ये हे तार्कीक तफावत किंवा विसंगती म्हणून दर्शविले जाईल. अशा प्रकरणी विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा आडनाव बदलल्याचा आवश्यक पुरावा सादर करणे

आवश्यक राहील. विवाह नोंदणी प्रमाणपत्र असल्यास हा प्रश्न उद्भवणार नाही.

१३. आता जी मुदत दिली आहे, त्यात एखाद्या मतदाराने आपले पुनरिक्षणाची माहिती दिली नाही तर त्याचे नाव कायमचे मतदार यादीतून बाद होईल का?

जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.- विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमात कोणी गणना प्रपत्र भरून दिले नाही तर त्याचे नाव प्रारुप मतदार यादीत समाविष्ट होणार नाही. मात्र प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर नवीन नोंदणीसाठी फॉर्म ६ व घोषणापत्र भरून व त्यासोबत भारत निवडणूक आयोगाने निश्चित केलेले कागदपत्र सादर केल्यास त्यांचे नाव मतदार यादीत समाविष्ट होऊ शकते.

१४. पुनरिक्षणासाठी ऑनलाईन प्रक्रिया करणे शक्य आहे का? असल्यास त्यासाठी उपलब्ध सुविधा कोणत्या?

जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.- नागरिक ECINET ॲप किंवा voters.eci.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने मतदार स्वतः गणना प्रपत्र ऑनलाईन भरू शकतात. तथापि, ऑनलाईन फॉर्म भरला तरी बी.एल.ओ. कडून होणारी प्रत्य

वैजापूरात रक्तदान शिबीराला उत्तम प्रतिसाद

वैजापूर, दि. २३ (प्रतिनिधी) – राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत येथील भगवान महावीर रुग्णालयात बुधवार (ता.२३) रोजी रक्तदान शिबीर संपन्न झाले. या शिबिरात ३०रक्तदात्यांनी रक्तदान करून आपले समाजाप्रतीचे व राष्ट्र प्रतीचे कर्तव्य पार पाडले. शिबिराचे उदघाटन नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी यांच्या उपस्थितीत झाले.

या प्रसंगी जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश पा.गलांडे, शेतकरी नेते धनंजय धोर्डे पाटील, सभापती दशरथ बनकर, विशाल शेठ संचेती,माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत, कैलास पवार, मंजाहरी गाढे, देविदास वाणी, लिमेश वाणी, तसेच नगरसेवक राजेश गायकवाड, प्रशांत कंगले, त्याचप्रमाणे डॉ.बी.बी.शिंदे, दिनेश राजपूत, विनोद राजपूत, सागर राजपूत, प्रेम राजपूत, सावनसिंह राजपूत, गणेश खैरे, शैलेश पोंदे, सुरेश तांबे, जवाहर कोठारी, प्रकाश माळी, बजरंग मगर, कल्याण काळे, भीमाशंकर साखरे यांची उपस्थिती होती. आरोग्य विभागातील डॉ. सविता निकाळे, निर्मला जाधव, अशोक गाडेकर, श्रीमती सिरसाट यांनी सहभाग नोंदविला. सदरील रक्त संकलन छत्रपती संभाजीनगर येथील दत्ताजी भाले रक्त पेढीने संकलित केले. या पेढीचे प्रमुख आप्पासाहेब सोमासे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सहभाग नोंदविला.

मनपाच्या वतीने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती निमित्त अभिवादन

छत्रपती संभाजीनगर, दि. २३ (प्रतिनिधी) –छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने आज लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंती निम्मित अभिवादन करण्यात आले.

पैठणगेट येथील लोकमान्य यांच्या पूर्णआकृती पुतळ्यास मा. महापौर समीर राजुरकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी स्थायी समिती सभापती अनिल मकरिये,नगरसेवक सचिन खैरे,आयुक्त अमोल येडगे,उद्यान अधिक्षक डॉ विजय पाटील,सहायक आयुक्त रमेश मोरे,वॉर्ड अभियंता आरती नवगीरे,माहिती व जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद, रविंद्र खरात, अतुल बनकर,संतोष कोठाळे, करण साळवे,इंजमाम उल हक आदींची उपस्थिती होती.

जिल्ह्यात श्रमशक्ती, उद्योग, कुटुंब उत्पन्न, स्थलांतर इ.विविध वार्षिक सर्वेक्षणाचे कामकाज सुरु

छत्रपती संभाजीनगर, दि. २३ (प्रतिनिधी) – राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयामार्फत नियतकालिक श्रमशक्ती,असंघटित क्षेत्रातील उद्योग, कुटूंब उत्पन्न, किंमत संकलन, स्थलांतर तपशील अशा विविध वार्षिक सर्वेक्षणाचे काम काज जिल्ह्यात सुरु आहे. या सर्वे क्षणांना नागरिकांनी आपल्या घरी येणाऱ्या प्रगणकांना सहयोग देऊन सहकार्य करावे,असे आवाहन वरिष्ठ सांख्यिकीय अधिकारी मुकेश बाबू यांनी केले आहे.

राबविण्यात येणारे सर्वेक्षण व त्याबाबत थोडक्यात माहिती याप्रमाणे– श्रमशक्ती सर्वेक्षण – नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण अंतर्गत श्रम शक्ती सहभाग दर, कामगार–लोकसंख्या गुणोत्तर आणि बेरोजगारी दर यांसारखे प्रमुख श्रमबाजार निर्देशांक तयार केले जातात. हे निर्देशांक ग्रामीण व शहरी भागांसाठी मासिक, त्रैमासिक तसेच वार्षिकस्तरावर प्रसिद्ध केले जाणार आहेत. याशिवाय, विविध वयोगट, लिंग, शिक्षणाची पातळी, रोजगार स्थिती, उद्योग व व्यवसाय यानुसार सविस्तर आकडेवारी वार्षिक अहवालाद्वारे उपलब्ध करून दिली जाणार आहे.

असंघटीत क्षेत्राचे सर्वे क्षण – तसेच भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्त्वपूर्ण असलेल्या असंघटित क्षेत्राची आर्थिक व कार्यात्मक माहिती संकलित करण्यासाठी असंघटीत क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वे क्षण २०२६ हे सर्वेक्षण आयोजित करण्यात आले आहे.

या सर्वेक्षणात उत्पादन, व्यापार आणि इतर सेवा क्षेत्रांतील असंघटित, बिगर–कृषी आस्थापनांचा समावेश असेल. या सर्वेक्षणातून रोजगार निर्मिती, उत्पादन, उत्पन्न, व्यवसायाची स्थिती आणि राष्ट्रीय उत्पन्नातील योगदान याबाबतची महत्त्वपूर्ण माहिती उपलब्ध होणार आहे.

किंमत संकलन सर्वेक्षण – शहरी, ग्रामीण भागातील ग्राहक किंमत निर्देशांक सर्वेक्षण केले जाते. त्यात एका निश्चित वेळापत्रकानुसार निवडक दुकाने, बाजारपेठा, सेवा प्रदाते आणी संस्थांकडून प्रत्यक्ष किमती गोळा करतात. वस्तूंची यादी आणि वजन हे घरगुती उपयुक्तता खर्च सर्वेक्षणावर आधारीत असतात. या प्रक्रियेत सर्वेक्षण गणक प्राथमिक सर्वेक्षण करेल. तपासणीचे काम वरिष्ठ सांख्यिकी अधिकारी व सर्वेक्षण पर्यवेक्षक हे करतील.

परिस्थिती मूल्यांकन सर्वे क्षण– या सर्वेक्षणात भारतातील शेतकरी कुटुंबाच्या आर्थिक स्थितीबाबत सविस्तर माहिती संकलित केली जाते. शेतकरी कुटुंबाचे उत्पन्न आणि उपभोग या विषयीचे मुल्यांकन केले जाते. ग्रामिण शहरी कुटूंबाची मालमत्ता,कर्ज, गुंतवणूकीचे स्वरुप याबाबत सर्वसमावेशक माहिती पुरविण्यात येते. ह्या सर्वेक्षणाचे काम सर्वेक्षण गणकद्वारे केले जाते तर तपासणीचे काम सर्वेक्षण पर्यवेक्षक करतात.

स्थलांतर तपशील सर्वे क्षण – या सर्वेक्षणात कुटुंब व व्यक्तिंच्या स्थलांतराचा व स्थलांतर पद्धतीचा अभ्यास केला जातो. ही माहिती संकलित करुन पुराव्यांवर आधारीत धोरणनिर्मितीस मदत होते. प्राथमिक काम सर्वेक्षण गणक करतात तपासणीचे काम पर्यवेक्षक करतात.

राष्ट्रीय कुटुंब उत्पन्न सर्वे क्षण – देशातील कौटुंबिक उत्पन्न आणि उत्पन्नाच्या वितरणाबाबत विश्वसनीय अंदाज करण्याच्या उद्देशाने हे सर्वेक्षण केले जाते.प्राथमिक काम सर्वे क्षण गणक करतात तर तपासणी पर्यवेक्षक करतात.

उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण – नोंदणीकृत सेवा क्षेत्रातील उपक्रमांचे केले जाणारे हे पहिले वार्षिक सर्वेक्षण आहे. कॉर्पोरेट सेवा क्षेत्रातील उपक्रस्मांवर एक व्यापक डेटाबेस तयार करण्यासाठी हे सर्वेक्षण केले जात आहे.

गोवा बनावटीच्या दारूचा मोठा भांडाफोड! सिल्लोड उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई

छत्रपती संभाजीनगर, दि. २३ (प्रतिनिधी) – राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सिल्लोड ई विभागाने गोवा राज्यातून महाराष्ट्रात अवैधरित्या आणल्या जाणाऱ्या मद्याविरोधात मोठी कारवाई करत तब्बल ११ लाख ८१ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत दोन चारचाकी वाहने, गोव्यात विक्रीस असलेल्या ३९६ विदेशी मद्याच्या बाटल्या तसेच बनावट मद्यनिर्मितीसाठी वापरले जाणारे हजारो प्लास्टिक बुचे जप्त करण्यात आले.

गुप्त माहितीच्या आधारे फुलंब्री–निधोना रोड तसेच फुलंब्री–नाचनवेल रोड परिसरात टाकलेल्या सापळ्यात दोन स्वतंत्र गुन्हे (क्र. १६६/२०२६ व १६७/२०२६) दाखल करण्यात आले. या कारवाईत सोमनाथ भागीनाथ जगताप, सत्तार अहमद शेख (बागवान) आणि विकास प्रभाकर गोराडे यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले असून जब्बार सत्तार बागवान हा आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे.

कारवाईदरम्यान रेनॉल्ट क्विड व मारुती सुझुकी इर्टिगा ही दोन वाहने, रॉयल इम्पॅक्ट ग्रेन व्हिस्कीच्या ३९६ बाटल्या, देशी दारूच्या भिंगरी संत्रा ब्रँडचे १५ हजार बुचे आणि विदेशी मद्याचे १,१६० बनावट प्लास्टिक बुचे जप्त करण्यात आले. प्राथमिक तपासात गोवा राज्यातून मद्य आणून महाराष्ट्राचा महसूल बुडवत बनावट मद्यनिर्मितीचा प्रकार सुरू असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

ही कारवाई अधीक्षक अभिनव बालुरे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक एन. आर. मुंजाळ व त्यांच्या पथकाने केली. पुढील तपास राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून सुरू आहे.

नागरिकांना आवाहन : अवैध मद्यनिर्मिती, विक्री किंवा वाहतुकीबाबत माहिती असल्यास राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या टोल फ्री क्रमांक १८००–२३३–९९९९ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

लोकमान्य टिळक जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

छत्रपती संभाजीनगर, दि. २३ (प्रतिनिधी) – भारतीय असंतोषाचे जनक बाळ गंगाधर उपाख्य लोकमान्य टिळक यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांना अभिवादन करण्यात आले.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती सविता चौधर यांच्या हस्ते लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. उपजिल्हाधिकारी (सामान्य शाखा) श्रीमती संगिता राठोड तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी–कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

'चरणसेवा'ने जपले लाखो वारकऱ्यांचे आरोग्य; ४.९६ लाखांहून अधिक वारकऱ्यांना लाभ

मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी) – गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या 'चरणसेवा' उपक्रमाचा समारोप शुक्रवार, दि. २४ जुलै रोजी होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामार्फत लोकसहभागातून हा उपक्रम राबविण्यात आला. यंदाच्या आषाढी वारीत राज्यातील १४ जिल्ह्यांतील ४ लाख ९६ हजारांहून अधिक वारकऱ्यांनी थेट चरणसेवा आणि आरोग्यसेवेचे लाभ घेतला.

आषाढी वारीदरम्यान वारकऱ्यांना होणारा शारीरिक ताण, स्नायूदुखी, पायांना येणारे फोड, थकवा तसेच पावसाळ्यातील संसर्गजन्य आजारांचा धोका लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला. मागील वर्षी सात जिल्ह्यांमध्ये सुरू झालेल्या या उपक्रमाचा यंदा विस्तार करून तो दिंडी मार्गावरील १४ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आला.

या चौदा जिल्ह्यांत उपक्रम : सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, बुलढाणा, अकोला, जालना, बीड, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, वाशिम, सांगली, अमरावती आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांतील १४० मुक्काम स्थळांवर सेवा केंद्रे उभारण्यात आली. या केंद्रांमधून वारकऱ्यांना चरणसेवा, मोफत आरोग्य तपासणी, फिजिओथेरपी, प्रथमोपचार, आवश्यक औषधांचे वितरण, रुग्णवाहिका सुविधा तसेच गरजेनुसार पुढील उपचारांची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली.

३ हजार लिटर आयुर्वेदिक औषधी तेलाचा वापर : या उपक्रमात १६४ आरोग्य संस्थांनी सहभाग घेतला. ७ हजार ५३८ स्वयंसेवक तसेच ११ हजार ३३१ डॉक्टर, वैद्यकीय प्रशिक्षणार्थी विद्यार्थी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी सेवाकार्यात योगदान दिले. सेवेसाठी १० हजार टी–शर्ट आणि ३ हजार लिटर आयुर्वेदिक औषधी तेलाचा उपयोग चरणसेवेसाठी करण्यात आला. तसेच ८ रथांद्वारे जनजागृती करण्यात आली. लोकसहभागातून साकारण्यात आलेल्या या उपक्रमातून तब्बल ४ लाख ९६ हजारांहून अधिक वारकऱ्यांना प्रत्यक्ष चरणसेवा आणि आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात आली.

दिंडीत अवयव दानावर जनजागृती : उपचारांबरोबरच आरोग्य जनजागृतीलाही विशेष महत्त्व देण्यात आले. आरोग्य जनजागृती रथांद्वारे स्वच्छता, सुरक्षित पिण्याचे पाणी, संसर्गजन्य आजारांपासून बचाव, रक्तदान, अवयवदान संदर्भात जनजागृती, निरोगी जीवनशैली तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती वारकऱ्यांपर्यंत आरोग्य रथाच्या माध्यमातून पोहोचविण्यात आली. **प्रतिक्रिया :** राज्यातील १४ जिल्ह्यांमध्ये ४ लाख ९६ हजारांपेक्षा अधिक वारकऱ्यांपर्यंत 'चरणसेवा' पोहोचविता आली, याचा आनंद आहे. या उपक्रमाच्या यशामागे लोकसहभाग हीच सर्वात मोठी ताकद ठरली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेला विविध आरोग्य संस्था, दानशूर व्यक्ती, डॉक्टर, वैद्यकीय प्रशिक्षणार्थी विद्यार्थी, आरोग्य कर्मचारी आणि हजारो स्वयंसेवकांनी दिलेल्या मोलाच्या सहकार्यामुळे हे सेवाकार्य यशस्वी झाले.

राजेश नाईक
कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष

जिल्हा परिषदेत लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी!

छत्रपती संभाजीनगर, दि. २३ (प्रतिनिधी) – 'स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळिवणारच',असे ब्रिटिशांना ठणकावून सांगणारे जहाल मतवादी विचारसरणीचे युगपुरुष लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची १७० वी जयंती साजरी करण्यात आली.

जिल्हा परिषद उपाध्यक्ष माननीय जितेंद्र जैस्वाल, वासुदेव सोळंके, अति मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे हस्ते लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

कार्यक्रमास राघवेंद्रजी घोरपडे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र), डॉ रमण इंगळे प्रभारी जिल्हा उपायुक्त यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. या प्रसंगी मा जैस्वाल यांनी लोकमान्य टिळकांच्या कार्याचा गौरव करत त्यांचे कार्य आजच्या पिढीला समजावून सांगणे व त्यांची विचारधारा जपण्यासाठी आजच्या नवयुवकांना प्रेरित करणे हा जयंती उत्सव करण्याचा मुख्य उद्देश असून, तो या कार्यक्रमामुळे सफल झाल्याचे आवर्जून सांगितले. तर डॉ रमण इंगळे यांनी लोकमान्य टिळकांनी स्वतंत्र्यासाठी दिलेलं बलिदान हे आपल्या सर्वासाठी मौल्यवान आहे.त्यांनी केलेल्या कार्याप्रती आपण जयंती साजरी करतोय हा खूप मोठा बहुमान आहे,असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ ज्ञानेश्वर बिडाईत सहा पशुधन विकास अधिकारी यांनी करून उपस्थित सर्वांचे आभार मानले.

नगरपालिकेत लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना १७०व्या जयंती निमित्त अभिवादन

वैजापूर , दि. २३ (प्रतिनिधी) – 'स्वराज्य माझा जन्म सिद्ध हक्क आहे, आणि तो मिळवणारच 'अशी सिंह गर्जना करणारे महान कर्मयोगी व भारतीयाच्या मनात स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित करणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या १७०व्या जयंती निमित्त नगरपालिकेत त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार व पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, माजी नगरसेवक लिमेश वाणी, मुख्याधिकारी भागवत बिघोत राजपूत, माजी शिक्षणांधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी प्रथम पुष्पहार हार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी नगरसेवक राजेश गायकवाड, जवाहर कोठारी यांच्या सह कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

'बटवारा १९४७'चं नवं गाणं 'कुठे निघून गेलास रे राम' प्रदर्शित; आईच्या प्रेमाची आणि श्रद्धेची हृदयस्पर्शी झलक

आमिर खान प्रॉडक्शन्सचा 'बटवारा १९४७' हा चित्रपट यंदाच्या वर्षातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या भारतीय चित्रपटांपैकी एक आहे. चित्रपटाची घोषणा, दमदार फर्स्ट पोस्टर आणि प्रभावी टीझरनंतर प्रेक्षकांमध्ये या चित्रपटाबद्दल प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. भारताच्या फाळणीच्या पार्श्वभूमीवर आधारित हा चित्रपट प्रेम, त्याग आणि धैर्याची हृदयस्पर्शी कथा मांडणार आहे. आता या वाढत्या उत्सुकतेदरम्यान निर्मात्यांनी चित्रपटातील नवं गाणं 'कुठे निघून गेलास रे राम' प्रदर्शित केलं आहे.

हे गाणं एका आईचं प्रेम, तिची प्रतीक्षा आणि तिचा अढळ विश्वास अतिशय सुंदरपणे व्यक्त करतं. गाण्याच्या व्हिडिओची सुरुवात शबाना आझमी भगवान श्रीरामांच्या भक्तीत तल्लीन होऊन प्रार्थना करताना होते. त्यांच्या मागे सनी देओल आणि प्रीती

झिंटा उभे असल्याचं दिसतं. त्यानंतर व्हिडिओ एका भव्य उत्सवाच्या मनमोहक दृश्यांकडे वळतो.

व्हिडिओ शेअर करताना निर्मात्यांनी लिहिलं आहे,

'एका आईची आर्त हाक
ऐका 'कुठे निघून गेलास रे राम',
आता प्रदर्शित.

या पार्टिशन डे निमित्त, १४ ऑगस्ट रोजी # Batwara1947 चित्रपटगृहांमध्ये अनुभवायला विसरू नका.'

महान संगीतकार ए. आर. रहमान यांनी 'कुठे निघून गेलास रे राम' या गाण्याला संगीतबद्ध, निर्मित आणि अरेंज केलं आहे. जावेद अख्तर यांच्या हृदयस्पर्शी गीतांना अनुराधा पौडवाल आणि शान यांच्या भावपूर्ण आवाजाची साथ लाभल्यामुळे हे गाणं आणखी खास बनलं आहे. सुरेल संगीत आणि भावनांचा अप्रतिम संगम असलेलं हे गाणं चित्रपटाच्या प्रभावी कथानकाची एक सुंदर झलक दाखवतं. त्यातील भावनिक दृश्यं आणि मनाला भिडणारं संगीत प्रेक्षकांची चित्रपटाबद्दलची उत्सुकता अधिकच वाढवतं. हे गाणं स्पष्टपणे सूचित करतं की 'बटवारा १९४७' हा चित्रपट प्रेक्षकांना चित्रपटगृहात एक अत्यंत भावनिक अनुभव देणार आहे.

'बटवारा १९४७' मध्ये शबाना आझमी, सनी देओल, प्रीती झिंटा, करण देओल, अली फझल आणि अभिमन्यू सिंह यांसारखे दमदार कलाकार प्रमुख भूमिकांमध्ये दिसणार आहेत. तब्बल तीन दशकांनंतर दिग्दर्शक राजकुमार संतोषी आणि सनी देओल ही यशस्वी जोडी पुन्हा एकत्र आली आहे. आमिर खान प्रॉडक्शन्सच्या बॅनरखाली तयार झालेल्या या चित्रपटाचं दिग्दर्शन राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक राजकुमार संतोषी यांनी केलं आहे.

चित्रपटाला ए. आर. रहमान यांचं संगीत लाभलं असून गीतं जावेद अख्तर यांनी लिहिली आहेत. या चित्रपटाची निर्मिती आमिर खान आणि अपर्णा पुरोहित यांनी केली आहे. बटवारा १९४७' हा चित्रपट १४ ऑगस्ट २०२६, म्हणजेच पार्टिशन डेच्या निमित्ताने जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.

: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

अनियमित बांधकाम हटविण्यात येणार; गुंठेवारी नियमितीकरणासाठी ३१ जुलै पर्यंतच ९० टक्के सवलत

नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा; मुदतवाढ मिळणार नाही-महानगर आयुक्त तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत

छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील ३१ डिसेंबर २०२० पूर्वीची विनापरवाना बांधकामे, मालमत्ता अभय योजनेअंतर्गत बेटरमेंट चार्जेस भरून नियमित करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामध्ये ०१ मे २०२६ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत बेटरमेंट चार्जेसवर फक्त १० टक्के शुल्क आकारण्यात आले आहे. म्हणजेच एकूण ९० टक्के सुट देण्यात आलेली आहे. या योजनेस यानंतर कुठल्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नसल्याने पात्र नागरिक, उद्योजक, विकासक, व्यावसायिकांनी तात्काळ नियमांनुसार आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करून गुंठेवारी नियमित करून घ्यावे, असे आवाहन सीएसआएमआरडीए आयुक्त तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज येथे केले. तसेच ३१ डिसेंबर २०२० नंतरची नियमानुसार नसलेली अनधिकृत बांधकामे हटविण्यासाठीची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

सीएसएमआरडीए कार्यालयात आज छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कामाचा आढावा सीएसआएमआरडीए आयुक्त तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत आज घेतला. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस महानगर नियोजनकार हर्षल बाविस्कर, महानगर उपआयुक्त (प्रशासन) लखीचंद चव्हाण, लेखाधिकारी विकास काकडे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

आयुक्त जी. श्रीकांत यांनी प्राधिकरण क्षेत्राचा नागरी व औदयोगिक विकास झपाट्याने होत असल्याने या क्षेत्रात विविध पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तसेच विकासकामांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने अनधिकृत बांधकाम प्राध्यान्याने हटविणे गरजेचे आहे, असे नमुद करित गुंठेवारी नियमित करण्यासाठी ९० टक्के सुट ही केवळ ३१ जुलै २०२६ पर्यंतच असल्याने सीएसएमआरडीए हद्दीतील पात्र मालमत्ता धारकांनी आपले मालमत्ता नियमित करून घ्यावी. त्यानंतर ०१ ऑगस्ट २०२६ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत ५० टक्के शुल्क आकारण्यात येईल. तर ०१ नोव्हेंबर २०२६ पासून मात्र पूर्ण शुल्क आकारले जाणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. तसेच नियमानुसार नसलेले अनधिकृत बांधकाम हटविण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. त्याचबरोबर बऱ्याच ठिकाणी इनामी जमीनींवर परवानगी नसतांना अनधिकृतपणे प्लॉटिंग करून विकल्या जात असल्याबाबत नागरिकांनी दक्ष राहावे, असे सुचित केले.

यावेळी जी. श्रीकांत यांनी सीएसएमआरडीएने १ ऑगस्ट, २०२६ पर्यंत ई- ऑफिस प्रणालीचा वापर सुरू करण्याचे निर्देश दिले. अनधिकृत बांधकामे प्राधान्याने हटविण्यासाठी निवृत्त सैनिकांचे एक टास्क फोर्स तातडीने स्थापन करण्याचे आदेश देत रस्ते, शासकीय जमीनींवरील अतिक्रमण, खाजगी जागेवरील अनधिकृत बांधकामे टप्प्या टप्प्याने हटविण्यासाठीची प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्याचे निर्देश दिले.

प्राधिकरण हद्दीतील नियोजनबद्ध विकास कामांना चालना देण्यासाठी अंतिम रेखांकन मंजुरीवेळी आवश्यक पायाभूत सुविधा जसे की अंतर्गत रस्ते, सांडपाणी वाहिनी,पाणीपुरवठा व्यवस्था, विद्युत वाहिनी व मनोरंजनात्मक खुल्या जागेमध्ये व रस्त्यालगत देशी प्रजातीची झाडे लावणे, इ. विकसित करणे व त्याची पडताळणी करणेबाबत विस्तृत धोरण निश्चित करणेबाबत संबंधितांना सूचना केली. या पायाभूत सुविधा प्रदान करतांना गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. यावेळी छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेशात येऊ घातलेल्या टोयोटा किलोस्कर, Ather, JSW Green Mobility यांसारख्या आंतरराष्ट्रीय व नामांकित कंपन्यांमुळे निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधी आणि त्यातून होणाऱ्या औद्योगिक व आर्थिक विकासाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर औद्योगिक क्षेत्रात उपलब्ध होणाऱ्या रोजगाराच्या संधींचा स्थानिक नागरिकांना, विशेषतः महिलांना अधिकाधिक लाभ मिळावा यासाठी रोजगाराशी संबंधित विविध घटकांचा केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांनुसार अभ्यास करणे आवश्यक आहे. महिलांचा आर्थिक सहभाग वाढल्यास त्यांचे आर्थिक स्वावलंबन वृद्धिंगत होईल, निर्णयप्रक्रियेतील त्यांचा सहभाग वाढेल, आर्थिक स्थैर्य सुधारेल तसेच

महिला सक्षमीकरणाला चालना मिळून प्रदेशाच्या सर्वसमावेशक व शाश्वत विकासास हातभार लागेल, असेही त्यांनी त्यांनी अधोरेखीत केले. छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकरिता प्रारुप विकास आराखडा तयार करणेच्या अनुषंगाने प्राधिकरण क्षेत्राच्या अस्तित्वातील जमीन वापर आराखड्यास पुरक विविध प्रकारची सर्वेक्षणे व करणे तसेच सूचना प्राधिकरण हद्दीतील विकास योजनांसाठी रस्ते मोजणी करून जागेवर सीमांकन करण्याकरिता एजन्सी नेमणे बाबत जी. श्रीकांत यांनी निर्देश दिले.

यावेळी त्यांनी प्राधिकरणाच्या रिक्त पदे भरण्यासोबतच अतिरिक्त मनुष्यबळ कंत्राटी पद्धतीने नियुक्त करणे, निवृत्त शासकीय अधिकरी, अधिवक्ता पदभरती व इत अनुषंगिक बाबींचा सर्वसामावेशक आढावा घेतला.

मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम; राजकीय पक्षांच्या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी केले शंकानिरसन

छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार जिल्ह्यात सुरु असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने बुधवारी (दि.२२) राजकीय पक्ष प्रतिनिधींची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. या बैठकीत जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी राजकीय पक्ष प्रतिनिधींनी विचारलेल्या शंकांचे निरसन केले, व राजकीय पक्षांनी पुनरिक्षण कार्यक्रमात सहयोग द्यावा,असे आवाहनही केले.

विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम २०२६ च्या अनुषंगाने बुधवारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या अध्यक्षतेखाली राजकीय पक्षांची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली. बैठकीत जिल्हाधिकारी गौडा यांनी पुनरिक्षण कार्यक्रमात सध्या सुरु असलेल्या कामकाजाबाबत माहिती दिली. पुनरिक्षण कामाची सद्यस्थितीबाबत पक्ष प्रतिनिधींना अवगत केले. राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या शंकांचे निरसन केले.

सर्व राजकीय पक्षांनी आपले मतदान केंद्रस्तरीय सहायक नेमावे,असे आवाहन करुन मतदान केंद्रस्तरीय सहायक यांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना पुनरिक्षण कामकाजत सहकार्य करावे,असे आवाहनही केले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती सविता चौधर तसेच आम आदमी पार्टी, बहुजन समाज पार्टी, कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया,इंडियन नॅशनल काँग्रेस,शिवसेना,शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि ए.आय. एम. आय. एम. इ. राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

'स्वच्छतेची वारी, विठुरायाच्या दारी' महानगरपालिका काढणार बाबा पेट्रोल पंप ते पंढरपूर पायी स्वच्छतेची दिंडी

महानगरपालिकेची स्वच्छता दिंडी वारी मार्गावर स्वच्छता करत जाणार विठुरायाची दारी

छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर शहरात छोट्या पंढरपूर येथे विठ्ठलाच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर भाविकांची वर्दळ अपेक्षित असल्याने वारी मार्गावर होणाऱ्या कचऱ्याचे पार्श्वभूमीवर तेथिल स्वच्छता व्यवस्थापन अधिक सक्षम आणि प्रभावी करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाची विशेष आढावा बैठक आयोजित करण्यात आली. ही बैठक महापौर समीर राजूरकर यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. या बैठकीत उप महापौर राजेंद्र जंजाळ, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, सभागृह नेता गोविंद केंद्रे, विरोधीपक्ष नेता अब्दुल समीर साजिद व आयुक्त अमोल येडगे यांची उपस्थिती होती.

या बैठकीस घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त नंदकिशोर भोंबे,कार्यकारी अभियंता यांत्रिकी अमोल कुल कर्णी, अनिल जाधव, विशाल खरात, किरण जाधव, चेतन वाघ, भूषण पाटील तसेच संबंधित विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीत शहरातून वाळूज पंढरपूर येथे जाणाऱ्या वारकरी आणि भाविकांसाठी स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व उपाययोजनांचा सविस्तर आढावा महापौर, पदाधिकारी व आयुक्त यांच्या तर्फे घेण्यात आला. वारी मार्गावर महानगरपालिकेची आवश्यकती यंत्रणा उपलब्ध करून देण्याच्या सूचना सुद्धा यावेळी करण्यात आल्या.

या बैठकीत प्रामुख्याने बाबा पेट्रोल पंप ते वाळूज पंढरपूर वारी मार्ग, शहरातील सर्व विठ्ठल मंदिर, मंदिर परिसर, सार्वजनिक ठिकाणे तसेच गर्दीच्या ठिकाणी स्वच्छता राखण्यासाठी विशेष पथके नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला.

कचरा संकलनाची वारंवारता वाढविणे, तात्पुरत्या घंटागाडी वारी मार्गावर तसेच शहरातील विठ्ठल मंदिर येथे उपलब्ध करून देणे, तसेच स्वच्छतागृहांची व्यवस्था करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ङमहानगरपालिकेच्या वतीने यावर्षी अनोखा उपक्रम राबविण्यात येणार आहे 'स्वच्छतेची दिंडी' काढून भाविकांमध्ये शहरातील नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. या दिंडीच्या माध्यमातून शहर स्वच्छतेबद्दल विविध संदेश देण्यात येणार आहे. तसेच या वारीसोबत १० पेक्षा जास्त घंटागाडी असणार आहे तसेच २०० पेक्षा जास्त स्वच्छता कर्मचारी सहभागी असणार आहे. ते सर्व कर्मचारी वारी मार्गावरील कचरा गोळा करत करत पंढरपूरला जाणार आहे. या वारीचे वैशिष्ट्य म्हणजे वारकऱ्यांच्या हातात झाडू, फावडे, असणार आहे ते जवळपास ८ किलोमीटरचा वारी मार्ग स्वच्छ करत करत विठुरायाच्या दर्शनासाठी जाणार आहे. प्रमुख मान्यवरांनी उपस्थितीत 'स्वच्छतेची वारी... विठुरायाच्या दारी' या वारीच्या संकल्पनेचा शुभारंभ २५ जुलै शनिवार रोजी सकाळी १० वाजता महावीर चौक, छत्रपती संभाजीनगर येथून करण्यात येणार आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची पांडुरंगाची सेवा भाव म्हणून आषाढी एकादशीच्या निमित्ताने शहरातून वाळूज पंढरपूर येथे जाणाऱ्या भाविकांना स्वच्छ, सुरक्षित आणि सुखद अनुभव मिळावा, यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे यावेळी आयुक्त अमोल येडगे यांनी स्पष्ट केले.

गरजू रुग्णांसाठी हर्षवर्धन जाधव यांची १० लाख रुपयांची देणगी

छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षासाठी दहा लाख रुपयांची देणगी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी करिता जनार्दन विधाते, निवासी उपजिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे सुपूर्द केला.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू रुग्णांना वेळेवर उपचारासाठी आर्थिक मदत मिळावी, या सामाजिक बांधिलकीतून त्यांनी ही देणगी दिली. मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामार्फत राज्यातील हजारो गरजू रुग्णांना उपचारासाठी आर्थिक सहाय्य दिले जात असून, समाजातील दात्यांच्या अशा योगदानामुळे या उपक्रमाला अधिक बळ मिळत आहे.

यावेळी मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या वतीने मा. हर्षवर्धन जाधव यांचे या सामाजिक योगदानाबद्दल आभार व्यक्त करण्यात आले.

सोयगाव येथे मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद; २ हजार नागरिकांनी घेतला लाभ

छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष तसेच समर्पण फाउंडेशन यांच्या समन्वयाने दि. २२ जुलै २०२६ रोजी ग्रामीण रुग्णालय, सोयगाव, ता. सोयगाव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे भव्य मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे कक्षप्रमुख मा. रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर मोठ्या प्रमाणावर मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येत असून, त्याच उपक्रमाचा एक भाग म्हणून हे शिबिर संपन्न झाले.

शिबिरामध्ये मेडिसिन, जनरल सर्जरी, कर्करोग, हृदयरोग, नेत्ररोग, अस्थिरोग, स्त्रीरोग, कान-नाक-घसा, दंतरोग, बालरोग आदी विविध शाखांतील तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची मोफत तपासणी करून उपचार व मार्गदर्शन केले. गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांना पुढील उपचारासाठी संबंधित तज्ज्ञ रुग्णालयांकडे संदर्भित करण्यात आले.

या शिबिराचा एकूण २,००० रुग्णांनी लाभ घेतला, तसेच ६०० चष्म्यांचे आणि ५६८ चालण्याच्या काठ्यांचे मोफत वाटप करण्यात आले. याशिवाय ५०० आय ड्रॉप्स, ११२ रक्त तपासण्या आणि ८६ ईसीजी तपासण्या करण्यात आल्या.

या शिबिरामध्ये ग्रामीण रुग्णालय, सोयगाव, रूबी स्टार रुग्णालय, जामनेर, शासकीय कर्करोग रुग्णालय, मराठवाडा कॅन्सर रुग्णालय, जे. जे. प्लस रुग्णालय, ओरियन सिटिकेअर रुग्णालय, सेंचुरी रुग्णालय, सेठ नंदलाल धूत रुग्णालय, डॉ. हेडगेवार रुग्णालय, कर्णावत कर्करोग रुग्णालय तसेच संतपुरे रुग्णालय (छत्रपती संभाजीनगर) यांनी सहभाग नोंदवून आरोग्यसेवा उपलब्ध करून दिली.

ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या परिसरातच तज्ज्ञ वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला सोयगाव व परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अशा जनकल्याणकारी उपक्रमांमुळे गरजू रुग्णांना वेळेवर उपचार उपलब्ध होण्यास मोठी मदत होत असून, मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या माध्यमातून राज्यभर अशा शिबिरांची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी समर्पण फाउंडेशनची टीम, ग्रामीण रुग्णालय सोयगावचे अधीक्षक डॉ. दिनाजी खंदारे, मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे डॉ. पुष्कर महाजन, डॉ. रुपाली रिंधे, डॉ. बालाजी गोरे तसेच सहभागी रुग्णालयांतील तज्ज्ञ डॉक्टर, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी आणि स्वयंसेवक यांनी विशेष परिश्रम घेतले.

छत्रपती संभाजीनगर महापालिकापथविक्रेता निवडणूक प्रक्रियेला उच्च न्यायालयाकडून स्थगिती; २५ जुलै रोजी होणारे मतदान पुढील आदेशापर्यंत रद्द

छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रातील पथविक्रेत्यांसाठी (फेरीवाले) आयोजित करण्यात आलेली बहुप्रतिक्षित निवडणूक प्रक्रिया मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार तूर्तास स्थगित करण्यात आली आहे. येत्या २५ जुलै २०२६ रोजी होणारे मतदान आता पुढील आदेशापर्यंत होणार नसल्याची माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्रीचे विनियमन) अधिनियम २०१६ मधील नियम १४ (२) अंतर्गत ८ विविध प्रवर्गातील पथविक्रेत्यांच्या सदस्यांची निवड करण्यासाठी निवडणूक घेण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार प्रशासनाने २९ जून २०२६ रोजी वर्तमानपत्रांमध्ये रीतसर निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध केला होता. या कार्यक्रमानुसार २५ जुलै २०२६ (शनिवार) रोजी प्रत्यक्ष मतदान पार पडणार होते.उच्च न्यायालयाची स्थगिती दरम्यान, या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेसंदर्भात मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली होती. त्यावर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने या निवडणूक प्रक्रियेला स्थगिती दिली आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता उच्च न्यायालयाचा पुढील अंतिम आदेश किंवा निर्देश येईपर्यंत निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे थांबवण्यात आली आहे.

या अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रातील सर्व ८ प्रवर्गातील नोंदणीकृत व संबंधित पथ विक्रेत्यांनी उच्च न्यायालयाच्या या निर्णयाची आणि निवडणूक स्थगितीची नोंद घ्यावी, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

(पान १ वरुन)

दिल्लीतील आंदोलनाचे महाराष्ट्रात...

त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

दिल्ली येथील लाठीमार प्रकरणाचे तीव्र पडसाद अकोल्यात उमटले आहेत. या घटनेच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी महाराष्ट्र बंदची हाक दिली. वंचितचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अकोला जिल्ह्यात बंदला स्वयंस्फूर्तीने प्रतिसाद मिळाला. वंचित आघाडीने पुकारलेला बंद यशस्वी करण्यासाठी आज सकाळपासून पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले. शहरातील प्रमुख मार्गावरून फेरी काढून वंचितच्या पदाधिकाऱ्यांनी व्यापाऱ्यांना बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. तुमच्या मुलांच्या भविष्यासाठी हा बंद पुकारण्यात आल्याचे पदाधिकाऱ्यांकडून व्यापाऱ्यांना सांगण्यात आले. अनेक व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने बंदमध्ये सहभाग घेऊन आपली दुकाने बंद ठेवली.

नीट पेपरफुटीविरोधात...

सरकारने संवादाऐवजी दडपशाहीची भूमिका घेतल्याचा आरोप त्यांनी केला.

नीट परीक्षेबाबत आपण सुरुवातीपासूनच केंद्रीकृत परीक्षेला विरोध केला होता, अशी आठवण करून देत त्यांनी, ''मी पंतप्रधानांना त्यावेळी सांगितले होते की, आज शेतकरी आत्महत्या करत आहेत, उद्या विद्यार्थी आत्महत्या करतील. दुर्दैवाने आज तेच घडताना दिसत आहे,'' असेही सांगितले.

विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आणि केंद्र सरकारपर्यंत जनतेचा रोष पोहोचवण्यासाठी २६ जुलै रोजी शिवाजी पार्क ते सिद्धिविनायक मंदिर असा संयुक्त मोर्चा काढण्यात येणार असल्याची घोषणा राज ठाकरे यांनी केली. ''हा केवळ मोर्चा नाही, तर विद्यार्थी, पालक आणि नागरिकांच्या भावना व्यक्त करणारे शक्तिप्रदर्शन असेल. सिद्धिविनायक येथे जाऊन सरकारला सद्बुद्धी मिळावी, अशी प्रार्थना करू,'' असे ते म्हणाले.

मुंबई, पालघर, नाशकात पावसाने...

१५ ते १६ गावांचा मुख्य बाजारपेठेशी असलेला संपर्क तुटला आहे

खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाने आज जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये आणि अंगणवाड्यांना सुट्टी जाहीर केली आहे. तसेच, सूर्या नदीला आलेल्या पुरामुळे नदीकाठच्या ६४ ते ६५ गावांना प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

नाशिक शहर आणि संपूर्ण जिल्ह्यात पावसाने जोरदार बॅटिंग सुरू केलीय. रात्रभर पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. पावसाच्या संततधारेमुळे गोदावरी नदीने रौद्र रूप धारण केले असून रामकुंड परिसरात पुराचे पाणी शिरले आहे. गोदाघाटावरील अनेक लहान-मोठी मंदिरे पाण्याखाली गेली असून, दुतोंड्या मारुतीच्या छातीपर्यंत पाण्याची पातळी पोहोचली आहे. याच दरम्यान, पाण्याचा अंदाज न आल्याने रात्रभर गांधी ज्योत परिसरातील मंदिरात अडकलेल्या एका नेपाळी पर्यटकाची सकाळी स्थानिक प्रशासन आणि जीव रक्षक दलाने सुखरूप सुटका केली आहे.

नाशिकमध्ये पावसाची संततधार सुरूच असल्याने गोदावरी नदीच्या पाणीपातळीत वेगाने वाढ झाली आहे. रामकुंड परिसरात आता पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून, परिसरातील ऐतिहासिक आणि छोटी मंदिरे पूर्णपणे पाण्याखाली गेली आहेत. पुराच्या पाण्याचा स्तर इतका वाढला आहे की, गोदाघाटावर असलेल्या प्रसिद्ध दुतोंड्या मारुतीच्या मूर्तीच्या छातीपर्यंत पाणी पोहोचले आहे. संभाव्य धोका लक्षात घेता, प्रशासनाने गोदाघाटावरील सर्व दुकाने आणि टपऱ्या सुरक्षित स्थळी हलवण्याच्या कडक सूचना व्यावसायिकांना दिल्या आहेत.

हर्षवर्धन सपकाळांचा महायुती...

दिली जात नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. लोकशाहीने दिलेला शांततापूर्ण आंदोलनाचा अधिकार हिरावून घेण्याचा प्रयत्न होत असून काँग्रेस हे कदापि सहन करणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

मुंबई पोलिसांच्या एका कर्मचाऱ्याचा कथित व्हिडिओ समोर आल्यानंतर त्यावरही सपकाळ यांनी भाष्य केले. या व्हिडिओमुळे गंभीर शंका निर्माण झाल्याचे सांगत संबंधित पोलिस कर्मचाऱ्याला तात्काळ निलंबित करून कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

या संदर्भात पोलिस महासंचालकांची भेट घेतल्याचे सांगत सपकाळ म्हणाले की, संबंधित कर्मचाऱ्यावरील चौकशी सुरू असून त्याच्यावर तातडीने कारवाई केली जाईल, असे आश्वासन प्रशासनाने दिले आहे. तसेच राज्यातील सर्व पोलीस अधीक्षकांची बैठक बोलावून आवश्यक सूचना दिल्या जाणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितल्याची माहिती त्यांनी दिली.

राहुल गांधींनी पळपुटेपणा सोडून...

करा. मात्र विद्यार्थ्यांचा वापर करून केवळ राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करू नका. विद्यार्थ्यांशी तुम्हाला काहीही देणेघेणे नाही, फक्त राजकारण करायचे आहे,'' अशी टीकाही त्यांनी केली.

फडणवीस यांनी केंद्र सरकारच्या भूमिकेचे समर्थन करत सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रकरणात कठोर कारवाई सुरू केली आहे. पेपर लीक करणाऱ्यांना शिक्षा देण्यासाठी फास्ट ट्रॅक न्यायालयांची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच नीटची फेरपरीक्षा कोणत्याही अडथळ्याशिवाय पार पडली असून त्यामुळे पुढील परीक्षांचाही मार्ग मोकळा झाला आहे.

ते म्हणाले, ''पंतप्रधानांवर विश्वास ठेवला पाहिजे. काँग्रेसच्या काळात शिक्षणासाठी केवळ ८ हजार कोटी रुपयांचे बजेट होते. आज ते वाढून १ लाख ३९ हजार कोटी रुपयांवर पोहोचले आहे. एम्स, आयआयटीसारख्या प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांमध्ये संधींची दारे खुली झाली आहेत. हे मोदी सरकारच्या धोरणांमुळे शक्य झाले आहे.''

शेवटी फडणवीस यांनी पुन्हा एकदा विरोधकांना आव्हान देत म्हटले, ''राहुल गांधींसह सर्व विरोधी पक्षांनी पळपुटेपणा सोडावा आणि संसदेत चर्चेला यावे. विद्यार्थ्यांचे खरे कैवारी असाल तर हिंमत दाखवा. लोकशाहीत चर्चा रस्त्यावर होत नाही, ती संसदेत होते. विद्यार्थीहिताचे निर्णय आंदोलनातून नव्हे तर चर्चेतूनच होऊ शकतात. मोदी सरकार विद्यार्थीहिताला सर्वोच्च प्राधान्य देत आहे.''

विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ठाकरे बंधूंनी आंदोलनाला पाठिंबा जाहीर केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले. ठाकरे बंधू विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या माध्यमातून आपल्या पक्षाचे राजकीय अस्तित्व शोधण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला. त्याचबरोबर मुंबई पोलिसांच्या व्हायरल व्हिडिओची दखल घेत संबंधित पोलिसावर तातडीने कारवाई करण्यात आल्याचे आणि संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

छत्रपती संभाजीनगरात एफडीएची कडक कारवाई; प्रसिद्ध 'उत्तम उपहारगृह'चा परवाना तडकाफडकी निलंबित

छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर शहरातील खवय्यांसाठी अत्यंत आवडते आणि विशेषतः चवदार इमरती, जिलेबी व समोशांसाठी प्रसिद्ध असलेल्या गुलमंडी परिसरातील मछलीखडक येथील ऐतिहासिक 'उत्तम उपहारगृह'वर अन्न व औषध प्रशासनाने धडक कारवाई केली आहे. या उपहारगृहात अस्वच्छ वातावरणात उघड्यावर अन्नपदार्थ बनवणे आणि पुनर्वापर केलेल्या तेलाचा वापर होत असल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी एफडीएच्या पथकाने या उपहारगृहाचा परवाना तडकाफडकी निलंबित करून दुकान तात्काळ बंद केले आहे.

उपहारगृहातील अनियमिततेबाबत गोपनीय माहिती मिळाल्यानंतर एफडीएचे सहआयुक्त श्रीकांत करकळे आणि सहायक आयुक्त दयानंद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अन्नसुरक्षा अधिकारी कि. ल. झाडे व त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या पथकाने बुधवारी या उपहारगृहावर अचानक छापा टाकला. तेव्हा तेथे अन्नपदार्थांच्या उत्पादकाऐवजी उपहारगृहाच्या नावाखाली चुकीचा परवाना काढल्याचे निष्पन्न झाले. समोसे आणि भज्यांसाठी वारंवार उकळलेल्या सरकी तेलाचा वापर केला जात होता. एफडीएने 'टीपीसी' मीटरने या तेलाची तपासणी केली असता, जे रिडिंग २५ च्या आत असणे बंधनकारक असते, ते थेट ५८ एवढे भयंकर आढळले. तर इमरती आणि जिलेबीसाठी वापरल्या जाणाऱ्या वनस्पती तेलाचे रिडिंग ३६ आढळले.

एफडीएच्या पथकाने स्वयंपाकघराची पाहणी केली असता तेथील अन्नपदार्थ तयार करण्याच्या ठिकाणी सर्रास झुरळांचा वावर होता. इडलीसाठी आंबवून ठेवलेले पीठ सांडपाण्याच्या अत्यंत जवळ उघड्यावर ठेवलेले आढळले. कचराकुंड्यांना झाकणे नव्हती आणि खिडक्यांना जाळ्या नव्हत्या. इतकेच नव्हे तर समोसा-भजे बनवण्याच्या ठिकाणी कामगारांच्या तंबाखू व चुन्याच्या डब्या ठेवलेल्या होत्या आणि भिंतींवर तंबाखू खाऊन थुंकलेले डाग स्पष्ट दिसत होते.

तपासात असेही दिसून आले की, इमरती व मिठाई आकर्षक दिसण्यासाठी आरोग्याला अत्यंत घातक असणाऱ्या रासायनिक खाद्यरंगांचा अमर्याद वापर केला जात होता. हे रंग किती प्रमाणात वापरावेत, याचे साधे ज्ञानही तेथील कामगारांना नव्हते. तसेच कामगारांची आरोग्य तपासणी केलेली नव्हती. एफडीए पथकाने पुनर्वापर होत असलेल्या खाद्यतेल आणि वनस्पती तेलाचे नमुने जप्त करून प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले आहेत. नागरिकांच्या जिवाशी खेळणाऱ्या या हॉटेलचा परवाना रद्द करून तात्काळ सील ठोकण्यात आल्याने शहरातील इतर हॉटेल चालकांचे धाबे दणाणले आहेत.